# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ / फाल्गुन ५, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री** | |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३४**

---

### राज्यातील खासगी व धर्मादाय रुग्णालयांमध्ये शासकीय आरोग्य योजनांची अंमलबजावणी बंधनकारक करण्याबाबत

**(१) * २३६९७ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धर्मादाय व खासगी रुग्णालयांनी रुग्णांना उपचार देण्यास नकार दिल्याच्या तक्रारी वाढत असल्यामुळे सर्व रुग्णालयांना शासकीय योजना बंधनकारक करण्याचे निर्देश आरोग्य विभागाने दिल्याची बाब माहे जुलै, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, राज्य शासनातर्फे धर्मादाय रुग्णालयांना जमिनी, कर सवलती व इतर सुविधा देवून देखील अशा रुग्णालयांकडून महात्मा फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत योजना आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम या योजनांचा लाभ रुग्णांना दिला जात नसल्याचे आढळले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धर्मादाय रुग्णालयांकडून “शासकीय योजनांचे दर अत्यल्प असल्याने उपचार परवडत नाहीत” या कारणावरून विरोध दर्शवून मा.उच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे दर सन २०१३ पासून न बदलल्याने ही योजना रुग्णालयांना आर्थिकदृष्ट्या परवडत नसून या दरांमध्ये वाढ करण्याकरीता स्थापन केलेल्या समितीने त्याबाबतचा अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, उपरोक्त प्रकरणी मा.आरोग्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) येथे आयोजित बैठकीत धर्मादाय रुग्णालयांच्या प्रतिनिधींनी अनुपस्थित राहून समन्वयक पाठविल्याने आरोग्य विभागाने संबंधित संस्थांकडून स्पष्टीकरण मागविले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने राज्यातील सर्व शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये उक्त योजना प्रभावीपणे लागू करण्यासाठी मोबाइल ॲप, डॅशबोर्ड आणि रुग्णालय-खाट माहिती प्रणाली सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

निर्धन रुग्ण निधी (IPF) शिल्लक नसल्याच्या कारणामुळे रुग्ण उपचारापासून वंचित राहू नये यासाठी आरोग्याशी संबंधित “महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना”, “आयुष्मान भारत योजना” “राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम” इत्यादी व अन्य सर्व आरोग्याशी संबंधित योजना लागू करण्याबाबत शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, दिनांक २१/०४/२०२५ अन्वये राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) होय. अशंत: खरे आहे.

निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी मोफत व सवलतीच्या दरात उपचार देणे बंधनकारक असून जे न्यास धर्मादाय रुग्णालय चालवतात अशा रुग्णालयांना राज्य सरकार मार्फत जमिन व अंशदानातून सूट दिली जाते. राज्यातील एकूण ४७९ धर्मादाय रुग्णालयांपैकी १३४ रुग्णालये एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत अंगिकृत आहेत.

विधि व न्याय विभागाच्या दिनांक २१/०४/२०२५ च्या शासन निर्णयान्वये सदर योजना लागू करण्याबाबत सर्व धर्मादाय रुग्णालयांना सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, प्रस्तुत प्रकरणी साधू वासवाणी मिशन व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल केली असून सदर याचिकेमध्ये सदर शासन निर्णयातील तरतूदी आव्हानित केल्या आहेत. सदर प्रकरणी शासन स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, दिनांक २१/०४/२०२५ नुसार राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांना आरोग्याशी संबंधित “महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना”, “आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना” लागू करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. सदर प्रकरणी साधू वासवाणी मिशन व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल केली असून सदर याचिकेमध्ये सदर शासन निर्णयातील तरतूदी आव्हानित केल्या आहेत. सदर याचिकेवर मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिकाकर्त्यांना संबंधित प्राधिकरणाकडे सविस्तर निवेदन देण्याबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार याचिकाकर्त्यांनी निवेदन सादर केले असून यासंदर्भात शासनस्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) होय.

सदर समितीने दिनांक ०८ जुलै, २०२५ रोजी शासनास अहवाल सादर केला असून सदर अहवालानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत उपचारांच्या संख्येत व दरात वाढ करण्यात आली आहे.

(५) एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची क्षेत्रीय व्यवस्थापक, जिल्हा समन्वयक व अंमलबजावणी सहाय्य संस्था यांची एकदिवशीय कार्यशाळा राज्य आरोग्य हमी सोसायटी यांचे मार्फत दिनांक २३ जुलै, २०२५ रोजी यशदा येथे आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यक्रमातील मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांच्या मार्गदर्शन सत्रास पुणे जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालयांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहण्याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक, पुणे यांनी दिनांक २२ जुलै, २०२५ रोजी सूचना निर्गमित केल्या होत्या.

(६) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी धर्मादाय रुग्णालयात/वैद्यकीय केंद्रात निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी वैद्यकीय उपचाराकरीता तयार केलेल्या योजनेची प्रभावी व पारदर्शकपणे अंमलबजावणी करण्यासाठी विधि व न्याय विभागांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामार्फत डॅश बोर्ड, ऑनलाईन प्रणाली विकसित करुन सुरु करण्यात आली आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातील पोलीस उप अधिक्षक यांच्या बेहिशोबी मालमत्तेची चौकशी करण्याबाबत

**(२) * २७२८७ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातील श्री.दयानंद गावडे, पोलीस उप-अधिक्षक हे बदलीस पात्र नसताना देखील महासंचालक कार्यालयाने दिनांक २६ ऑगस्ट, २०२४ रोजी लाचलुचपत परिक्षेत्र, पुणे विभाग येथे अंतर्गत बदली नियमबाह्यरित्या केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, मौजे खडकवाडी (ता.हवेली) येथे श्री.गावडे यांच्या पत्नी सौ.पविना यांच्या नावे जमिन घेऊन कोट्यवधी रुपयांचे फार्म हाऊस बांधले असून गुणवरे, कोळकी (ता.फलटण) या गावात कोट्यवधी रुपयांची बेहिशोबी मालमत्ता असताना या सर्व मालमत्तेची उघड चौकशी करण्यास महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, श्री.गावडे यांनी गैरव्यवहार करून मिळविलेल्या मालमत्तेची माहिती लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०२५ रोजी महासंचालक लाचलुचपत कार्यालयास पुराव्यानिशी देऊनही त्यांच्या बेहिशोबी मालमत्तेची उघड चौकशी केली नसून त्यांनी खरेदी केलेल्या मालमत्तेस शासनाने मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणात श्री.गावडे यांना संरक्षण देऊन सर्व संबंधित वरिष्ठ अधिकारी शासनाची दिशाभूल करीत असल्याने त्याची चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने श्री.गावडे यांच्या गैरव्यवहाराची आणि मालमत्तेची उघड चौकशी केंद्रीय अन्वेषण विभागामार्फत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक २६.०८.२०२४ रोजी श्री.दयानंद गावडे, पोलीस उप-अधीक्षक (एटप) यांची बदली महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या स्तरावरील आस्थापना मंडळाच्या मान्यतेने करण्यात आली आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी मा.लोकप्रतिनिधी यांचा दिनांक २४.१२.२०२५ रोजीचा तक्रार अर्ज लाचलुचपत प्रतिबंधक विभागास प्राप्त झाला असून सदर तक्रार अर्जातील आक्षेपावर महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांच्या कार्यालयाच्या दिनांक १६.०१.२०२६ रोजीच्या आदेशान्वये चौकशी करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पात्रुड (ता.माजलगाव, जि.बीड) येथे गुलजार-ए-रजा या बनावट ट्रस्टने धार्मिक कार्याच्या नावाखाली लोकांकडून कोट्यवधी रूपयांच्या देणग्या घेतल्याबाबत

**(३) * २३३६९ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पात्रुड (ता.माजलगाव, जि.बीड) येथे धार्मिक कार्याच्या नावाने लोकांकडून कोट्यवधी रूपयांच्या देणग्या घेणे, आयकर विभाग, शासनाची फसवणूक करणे, एकाच बँकेतील ५ खात्यावर ४ कोटी ७३ लाख रुपयांची रक्कम आढळून आल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी छत्रपती संभाजीनगर येथील दहशतवाद विरोधी पथकाने दिनांक ८ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास गुलजार-ए-रजा या बनावट ट्रस्ट व ट्रस्टच्या ४ विश्वस्तांच्या विरोधात माजलगाव ग्रामीण (जि.बीड) पोलीस स्टेशन येथे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल केले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

पात्रुड (ता.माजलगाव, जि.बीड) येथे गुलजार-ए-रजा नावाने बनावट ट्रस्ट स्थापन करुन सदर गुन्ह्यातील आरोपींनी धार्मिक कार्याच्या नावाखाली देणगी म्हणुन लोकांकडुन रु.४,७३,६७,५०३/- जमा करुन आयकर विभाग, शासनाची फसवणुक केली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी दहशतवाद विरोधी पथकातील पोलीस कॉन्स्टेबल श्री. शेख यांच्या सरकार तर्फे फिर्यादीवरुन एकुण चार आरोपींविरुध्द पोलीस ठाणे माजलगाव, ग्रामीण येथे दि. ०८ जानेवारी, २०२६ रोजी गु.र.नं. ०९/२०२६ कलम ३१८(४), ३३५, ३३६(२), ३४०, ३(५) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशी करुन तात्काळ उपरोक्त प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन दोन आरोपींना दि. ०८.०१.२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.

अटकेतील दोन्ही आरोपींची मा.न्यायालयाकडुन दि. १५.०१.२०२६ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेवुन आरोपींची घरझडती घेण्यात आली असून तसे निल पंचनामे केलेले आहे.

ॲक्सीस बँकेकडुन संबंधित बँक खात्यांची स्टेटमेंट घेण्यात आले आहे तसेच जिल्हा वक्फ अधिकारी अहिल्यानगर यांच्याकडुन फैजान-ए-कन्झुल इमान भिंगार अहिल्यानगर या संस्थेचा रजिस्ट्रेशन क्रमांक गुलजार-ए-रजा या ट्रस्टला वापरल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेकडून कागदपत्रे हस्तगत करण्यात आले आहे.

तसेच जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांना पत्र देवून विचारणा केली असता त्यांच्याकडे सदर संस्थेचे रजिस्ट्रेशन नसल्याबाबत जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांनी कळविले आहे. तसेच सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, केज यांनी गुलजार-ए-रजा फाँडेशन, सत्तार गल्ली, पात्रुड ही संस्था त्यांच्या कार्यालयांतर्गत नोंदणी करण्यात आली नसल्याचे कळविले आहे.

सदर गुन्ह्यात आरोपींनी गुलजार-ए-रजा या संस्थेचे धर्मादाय उपआयुक्त, सार्वजनिक न्यास. नोंदणी कार्यालय बीड यांच्याकडे रजिस्ट्रेशन न करता दुसऱ्याच संस्थेच्या बोगस नंबर वापरुन लोकांकडुन गुलजार-ए-रजा या ट्रस्ट चे नावाने जवळपास ४,७३,६७,५०३/- इतकी रक्कम जमा करुन फसवणुक केल्याबाबत आयकर विभाग, छत्रपती संभाजी नगर यांना पत्र व्यवहार करुन गुन्हा संबंधाने माहिती मागवून त्यांच्या स्तरावर चौकशी व कायदेशीर कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तसेच अटकेतील आरोपींचे मोबाईल हॅन्डसेट जप्त करण्यात आले असुन मोबाईल नंबरचे सीडीआर घेण्यात आले आहे. गुन्ह्यातील पाहीजे असलेले दोन आरोपींचा शोध सुरु आहे, सद्यस्थितीत गुन्ह्याचा पुढील तपास सरु आहे.

(४) विलंब नाही.

-----------------

## नाशिक येथील गोवर्धन ते सुला वाइन रस्त्यावरील मृत्यूप्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(४) * २३५४९ श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील गोवर्धन ते सुला वाइन रस्त्यावरील पाम स्प्रिंग हॉटेल समोर अंमलीपदार्थाचे सेवन केलेल्या तरुणाने भरधाव वेगाने कार चालवत रस्त्यालगत असलेल्या व्यक्तीला टक्कर मारल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना दिनांक ८ मार्च, २०२५ रोजी घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी आरोपीविरुध्द नाशिक ग्रामीण तालुका पोलीस ठाणे येथे दिनांक ९ मार्च, २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असतानांही अद्यापपर्यंत आरोपीच्या रक्ताची चाचणी करण्यासाठीचे रक्ताचे नमुने उपसंचालक प्रादेशिक न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा, नाशिक यांच्याकडे पाठविण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, गुन्ह्याचे आरोपपत्र (Charge Sheet) तीन महिन्याच्या आत मा.न्यायालयात दाखल करणे आवश्यक असतांनाही अद्यापपर्यंत चार्जशीट दाखल करण्यात आले नसून, संबंधित पोलीस ठाण्यामधील पोलीस निरीक्षक आरोपीस वाचवण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप मृत व्यक्तीच्या कुटुंबियांकडून केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करुन सर्व संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी नाशिक तालुका पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण येथे दि.०९.०३.२०२५ रोजी गु.र.नं. ३४/२०२५ भा.न्या.सं.२०२३ चे कलम १०६(१), १२५(अ), १२५(ब), ३२४(४) मो.वा.का. कलम १८४/१८५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्ह्यात आरोपीस निष्पन्न करुन अटक करण्यात आली आहे.

दिनांक २२.१२.२०२५ रोजी रासायनिक प्रयोगशाळा येथे मुद्देमाल जमा करुन दि. २३.१२.२०२५ रोजी मा. न्यायालयास पत्र देवून रासायनिक प्रयोगशाळा येथील पोच पावती गुन्ह्याचे मुळ कागदपत्रात समाविष्ठ करण्यात आली आहे.

(३) सदर गुन्ह्यातील आरोपीचे वैद्यकिय अधिकारी यांनी संकलित केलेले रक्ताचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीकामी जमा करण्यास विलंब झाल्याने सदरच्या गुन्ह्यातील आरोपीविरुध्द दिनांक ११.१२.२०२५ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

(४) सदर गुन्ह्यातील तपासी अंमलदार यांनी दोषारोपपत्र विलंबाने सादर करुन गुन्ह्याच्या तपासकामी कसुराई केल्याने त्यांची विभागांतर्गत चौकशी सुरु करण्यात आली आहे.

तसेच सदर प्रकरणाची चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयास विनाविलंब सादर करण्याबाबत विशेष पोलीस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र यांना दि.१३.०२.२०२६ रोजीच्या ज्ञापनान्वये पोलीस महासंचालक कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

तसेच आरोपीला अटक केल्यानंतर त्यांची वैद्यकिय तपासणी केली असता तो दारुच्या अंमलाखाली आहे असे प्राथमिक प्रमाणपत्र वैद्यकिय अधिकाऱ्यांनी दिलेले असून ते दोषारोपपत्रासोबत मा. न्यायालयात सादर करण्यात आले आहे.

(५) प्रशासकिय कारणास्तव.

-----------------

**राज्यात नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ऑर्केस्ट्राबार व डान्सबारविरुद्ध कारवाई करण्याबाबत**

**(५) * २३३९२ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत राज्य शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन सुमारे ७५ ऑर्केस्ट्राबार पहाटे चार वाजेपर्यंत सुरु असून येथील बारबाला आणि वेटर म्हणून काम करणाऱ्यांचा नोकरनामा १४ ते १५ इतका असतांना येथे ४० ते ४५ महिला बारमध्ये काम करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पुणे आणि मुंबईच्या सीमेवर असलेल्या मावळ तालुक्यात लेडीज डान्सबार सुरु असून दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव येथे बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या डान्सबारवर मध्यवर्ती ग्रामीण पोलिसांनी छापा टाकून ५६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून ७० जणांविरुद्ध गुन्हे दाखल केल्याची घटना दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग १ आणि २ प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ऑर्केट्राबार व डान्सबारविरुद्ध तसेच याप्रकरणी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित पोलीसांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) मावळ तालुक्यात डान्सबार नसून, परवानाधारक ऑर्केस्ट्राबार आहेत. मावळ तालुक्यातील ३ ऑर्केस्ट्राबार आस्थापनाधारकांनी परवान्यातील अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याने त्यांचेविरूद्ध दिनांक १३.१२.२०२५ रोजी वडगाव मावळ पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गु.र.क्र. ३३३/२०२५ व गु.र.क्र. ३३४/२०२५ अन्वये २ गुन्हे तर, कामशेत पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गु.र.क्र. २४५/२०२५ अन्वये १ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपरोक्त तीनही गुन्ह्यांचा तपास पुर्ण झाला असून, मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहेत.

कंदलगाव, ता.दक्षिण सोलापूर येथील ऑर्केस्ट्राबार आस्थापनेने परवान्यातील अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याने त्यांचेविरूद्ध व ऑर्केस्ट्राबार मधील महिला व प्रेक्षक अशा ७१ व्यक्तींविरूद्ध दिनांक ०१.०१.२०२६ रोजी मंद्रुप पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.०१/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात रू.५६,०१,८९०/- इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे. सदर प्रकरणी मंद्रुप पोलीस स्टेशनमधील सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस अंमलदार यांना एक वर्ष वेतनवाढ स्थगितीची शिक्षा देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: मुंबई व अहिल्यानगर शहरात 'डिजिटल अरेस्ट' आणि ऑनलाईन फसवणुकीद्वारे लूट होत असल्याबाबत

**(६) * २४३३३ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या पश्चिम उपनगरात एका ६८ वर्षीय ज्येष्ठ महिलेची 'डिजिटल अरेस्ट' आणि ऑनलाईन फसवणुकीद्वारे सुमारे ३.७५ ते ३.८ कोटी रुपयांची लूट झाल्याची घटना माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये निदर्शनास आली असून सदर प्रकरणात सायबर गुन्हेगारांनी पोलीस अधिकारी, सीबीआय आणि भारताच्या सरन्यायाधीशांचे नाव सांगून बनावट 'ई-कोर्ट'द्वारे महिलेला मानसिक दबावात ठेवले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कोपरगांव (जि.अहिल्यानगर) शहरातील एका सेवा निवृत्त अधिकाऱ्यास डिजिटल अटक व सायबर गुन्ह्यांची भीती दाखवत त्यांच्या व पत्नीच्या बँकखात्यातून सुमारे ८७ लाख ३० हजार रुपयाची ऑनलाईन फसवणूक झाल्याची घटना दिनांक २० जानेवारी, २०२६ रोजी निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह 'डिजिटल अरेस्ट' सारख्या गंभीर सायबर गुन्ह्यांना पायबंद घालण्यासाठी आणि फसवणूक झालेली रक्कम पीडितांना परत मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

विरा देसाई रोड, अंधेरी (प.), मुंबई येथे एका महिलेस आधारकार्डवरुन बेकायदेशीर व्यवहार होत असल्याचे व त्यांचे बॅंक अकाउन्ट्स हे मनी लॉन्ड्रींगमध्ये वापरल्याचे खोटे सांगून त्यांच्या नावाने वेगवेगळे एफ.आय.आर. रजिस्टर असल्याचे सांगून त्यांच्या विविध बॅंक खात्यावरुन जबरदस्तीने एकूण रु.३,७१,००,०००/- हस्तांतरण करण्यास भाग पाडून आर्थिक फसवणूक केल्याबाबत सायबर पोलीस ठाणे पश्चिम विभाग, गु.शा.,बांद्रा, मुंबई येथे दि.१३.१०.२०२५ रोजी गु.र.क्र.३०६/२५ भारतीय न्याय संहीता कलम २०४, २०५, ३१९(२), ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३३८, ३४०(२), ६१(२) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम, ६६(क), ६६(ड) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमूद गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आली असून आरोपीने विविध बॅंक खात्यात वळती केलेल्या फसवणूक रक्कमेपैकी रु.२५,५९,१५०/- इतकी रक्कम गोठविण्यात आली आहे. तसेच गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) विवेकानंदनगर, कोपरगाव, जि.अहिल्यानगर येथे राहणाऱ्या एका सेवा निवृत्त अधिकाऱ्यास डिजीटल अरेस्ट ची भिती दाखवून रु.८७,३०,४००/- इतकी आर्थिक फसवणूक केल्यासंदर्भात कोपरगाव शहर पोलीस ठाणे येथे दि.२०.०१.२०२६ रोजी गु.र.क्र.२९/२६ भारतीय न्याय संहीता कलम ३१८(२), ३१६(२) सह माहिती व तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६(ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील फसवणूक झालेल्या रक्कमेपैकी रु.७८,००,०००/- इतकी रक्कम होल्ड करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

(४) राज्य शासनाने सायबर फसवणूकीला बळी पडणाऱ्या नागरिकांना विशेषत: महिला, बालके व ज्येष्ठ नागरिकांना केंद्र स्थानी ठेवून अत्याधूनिक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि संसाधनांनी युक्त अशा उपाय योजनांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प कार्यान्वीत केला आहे.

राज्यभरातील सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापे, नवी मुंबई येथे सायबर सुरक्षा प्रकल्पाचे मुख्यालय तसेच नोडल सायबर पोलीस स्टेशन कार्यरत असून त्याद्वारे राज्यातील ५० जिल्हा सायबर लॅब्स/ पोलीस ठाणे तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी कार्यरत आहे.

महाराष्ट्र सायबर कार्यालयाकडून २६ तज्ञ सल्लागारांच्या मदतीने राज्यातील १००० पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना Forensic Tools चे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहे.

सर्व प्रकारचे सायबर गुन्हे रोखण्याकरीता www.cybercrime.gov.in ही वेबसाईट व सायबर हेल्पलाईन नंबर १९३० बाबत सर्व सामान्य जनतेत महाराष्ट्र सायबरच्या सोशल मिडीया Twitter, Instagram, Facebook, YouTube अकांउट- द्वारे जनजागृती करण्यात आली आहे.

तसेच राज्यातील ३४ रेल्वे स्थानकांवरून महारेल एलईडी/ एलसीडी स्क्रीनद्वारे सायबर गुन्ह्याबाबत प्रभाविपणे जनजागृती करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात दूध खरेदी दरात वाढ न झाल्यामुळे दूध उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याबाबत

**(७) * २३१०२ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.शंकर मांडेकर (भोर), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके (शिरुर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पशुखादयाच्या किंमतीत झालेली भरमसाठ वाढ व चारा टंचाईमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांसाठी गेल्या सहा महिन्यांपासून दूध खरेदी दरात वाढ न झाल्यामुळे उत्पादन खर्च वाढूनही उत्पन्न घटल्याने दूध उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दूध उत्पादीत जनावरांच्या किंमती, पशुखादयाचे वाढलेले दर तसेच हिरवा चारा उपलब्ध होत नसल्याने दुध उत्पादनात १० ते २० टक्क्यांनी घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे जुलै ते सप्टेंबर, २०२५ मध्ये दुधाला प्रतिलिटर ५ रुपये अनुदान तर माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर मधील दुधाला प्रतिलिटर ७ रुपये अनुदान दर देण्याचा निर्णय घेऊनही पहिल्या टप्प्यातील अनुदान व दुसऱ्या टप्प्यातील हक्काचे अनुदान अद्याप शेतकऱ्यांना देण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दुधाला योग्य दर मिळावा तसेच शासनातर्फे अनुदान प्राप्त व्हावे याकरीता दुध उत्पादक शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व मा.दुग्धविकास मंत्री यांच्याकडे वांरवार मागणी करुन त्याबाबतचा निर्णय घेतला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दुधाला योग्य दर मिळण्याकरिता व अनुदान देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) हे खरे नाही. मागील ३ वर्षांत पशुखाद्याच्या दरामध्ये तसेच हिरवा चारा, सुका चारा व मुरघास यांच्या दरामध्ये प्रचंड मोठी वाढ झालेली नाही. त्यामुळे राज्यातील दूध उत्पादनात घट झालेली दिसून येत नाही.
(३), (४) व (५) हे खरे नाही. दुग्धविकास विभागाच्या दि.१२.०७.२०२४ व दि.२६.०९.२०२४ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सहकारी दुध संघ व खाजगी दुध प्रकल्प यांना दुध पुरवठा करणाऱ्या पात्र दुध उत्पादक शेतकऱ्यांना दुधासाठी अनुक्रमे प्रती लिटर रु.५/- व रु.७/- अनुदान योजना राबविण्यात आली. प्रती लिटर रु.५/- अनुदान योजनेकरीता ६३२३१८ पात्र युनिक शेतकऱ्यांच्या वैयक्तिक बँक खात्यात रु.६८४,३०,९५,७५०/- अनुदान डीबीटीद्वारे वर्ग करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे प्रती लिटर रु.७/- अनुदान योजनेकरीता ५६८७१५ पात्र युनिक शेतकऱ्यांच्या वैयक्तिक बँक खात्यात रु.६१०,८३,३४,१२०/- अनुदान डीबीटीद्वारे वर्ग करण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत राज्यात गायींच्या दुधासाठी प्रति लिटर रु.३५/- ते रु. ३८/- असा दर देण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यातील पोलिसांनी अंमली पदार्थ विरोधी केलेल्या कारवाईत कोट्यवधी रुपयांचा अंमली पदार्थांचा साठा जप्त केल्याबाबत

**(८) * २३६७८ श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.विलास तरे (बोईसर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय देरकर (वणी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), डॉ.राहूल पाटील (परभणी)** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अंमली पदार्थ विरोधी मोहिमेअंतर्गत मुंबई पोलिसांनी सुमारे १६०० कोटी इतक्या रकमेचा अंमली पदार्थाचा साठा जप्त करुन सुमारे १४०० व्यक्तींना अटक केली असून यामध्ये सर्वाधिक ‘एमडी’ (मेफेड्रोन) या

ड्रग्जचा समावेश असून त्याची बाजार भावाप्रमाणे किंमत सुमारे ६४८ कोटी रुपये असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पायधुनी पोलीसांनी मशीद बंदर व ओशिवरी येथे सुमारे ३६ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ (हेरॉइन) जप्त करुन ९ व्यक्तींना अटक केली असल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०२५ रोजी निदर्शनास आले असून, वांद्रे (पूर्व) येथील निर्मलनगर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांची विक्री व सेवन होत असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पोलीस आयुक्त, झोन-८, वांद्रे पूर्व, मुंबई यांचेकडे दिनांक ८ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, खारेगाव (जि.ठाणे) येथे सुमारे २ कोटी रुपयांचा ६३८ किलो गांजा पोलीसांनी हस्तगत केला असून भिवंडी येथील गुन्हे शाखेच्या पोलिसांनी एमडी ड्रग्जची तस्करी करणाऱ्या २ व्यक्तींना अटक करुन सुमारे ३१ कोटी ८४ लाख ८० हजार रुपयांचा माल माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, मोखाडा (जि.पालघर) येथील मौजे चिचुतार गावाजवळ पकडलेल्या वाहनाची पोलीसांनी तपासणी केली असता केलेल्या कारवाईत ११ किलोपेक्षा जास्त अफू वनस्पतीच्या सुकलेल्या बोडांचा चुरा आणि एक कार असा एकूण १५ लाख ८० हजार ३४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, रायगड पोलिसांनी मागील वर्षभरात अंमली पदार्थ तस्कारांवर कारवाई करीत ३२ आरोपींना अटक करुन १२३ किलो ७६८ ग्रॅम वजनाचे किमान ९४ कोटी ४५ लाख ७८ हजार ७७५ रुपये किंमतीचे अंमली पदार्थ व नवी मुंबईतील अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सने वाशी परिसरातील जुन्या बस डेपोजवळ १.४८ कोटी रुपयांचा एमडी साठा जप्त केला असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अंमली पदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासह या रॅकेटमधील मुख्य सूत्रधार (Kingpins) आणि आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळी उद्ध्वस्त करण्यासाठी शासनाने कोणती विशेष उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

मुंबई शहरामध्ये अंमली पदार्थाची तस्करी करणे बाबत सन जानेवारी २०२६ ते ११.०२.२०२६ पर्यंत एकूण ९३ गुन्हे दाखल करुन त्यामध्ये ११२ आरोपींना अटक करण्यात आली असून अंदाजे रु.७.९३ कोटी किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

त्याचप्रमाणे एम.डी (मेफेड्रॉन) या अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्यांविरुध्द एकूण ३४ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ४९ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सन २०२५ मध्ये अंमली पदार्थाची तस्करी करणे बाबत  एकूण ११४१ गुन्हे दाखल करुन त्यामध्ये १४५४ आरोपींना अटक करण्यात आली असून अंदाजे रु.८५७ कोटी किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

तसेच एम.डी (मेफेड्रॉन) या अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्यांविरूध्द एकूण २७५ गुन्हे दाखल करुन त्यामध्ये ३९४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यामध्ये एकूण ३१३.७१७ किलोग्रॅम वजनाचे अंदाजे रु.६५०.०६ कोटी किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(२) दि.१६.१२.२०२५ रोजी लोहा भवन प्लॉट ९३ च्या गेट बाहेरील रस्ता, पी.डीमेलो रोड, मस्जिद बंदर पुर्व, पायधुनी, मुंबई येथे दोन व्यक्तींच्या ताब्यात एकूण अंदाजे रु.१,३०,४८,०००/- किंमतीचे ३२६.२२ ग्रॅम गर्द पावडर हा अंमली पदार्थ वाहतूक व विक्री करण्याच्या उद्देशाने स्वत:च्या ताब्यात बेकायदेशीररित्या बाळगल्याने त्यांच्या विरुद्ध पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.१७१५/२५, एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८(क) सह २१(क),२९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या पुढील तपासात एकूण १७

आरोपींना अटक करण्यात आले असून त्यांच्याकडून एकूण अंदाजे रु.३६,८७,०४,६००/- किंमतीचा ९२१७.५४ ग्रॅम वजनाचा गर्द हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. सद्यस्थितीत सदर गुन्ह्यातील १७ आरोपी न्यायालयीन कोठडीत असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयामार्फत परिमंडळ ८ च्या हद्दीतील स्थानिक पोलीस ठाणे निर्मल नगर परिसरात सन २०२५ ते जानेवारी २०२६ पर्यंत एन.डी.पी.एस. कायद्याअन्वये ड्रग्ज विक्री संदर्भात १० गुन्हे दाखल असून १० आरोपींना अटक केली आहे. तसेच अंमली पदार्थ सेवनाबाबत एकूण ८ गुन्हे दाखल असून ८ आरोपींना अटक केली आहे.

तसेच अंमली पदार्थांची विक्री व सेवन संदर्भात पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ८, मुंबई या कार्यालयास स्थानिक लोकप्रतिनीधी यांचेकडून दि.०८.०१.२०२६ रोजी तक्रार अर्ज प्राप्त झाला नसून दि. ०१.०८.२०२५ रोजी प्राप्त झाला आहे.

(३) ठाणे येथील खारेगाव टोल नाक्याजवळ एका व्यक्तीच्या ताब्यात रु.२,०४,००,०००/- किंमतीचे एकूण ६३८ किलो वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ मिळून आल्याने त्याच्याविरुद्ध कळवा पोलीस स्टेशन, ठाणे येथे दि.३१.१२.२०२५ रोजी गु.र.नं.९५८/२०२५ एन.डी.पी.एस. ॲक्टचे कलम८(क), २०(ब), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात २ आरोपींना अटक करण्यात आली असून सद्यस्थितीत दोन्ही आरोपी न्यायालयीन कोठडीत असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

तसेच ओम साई फॅमिली ढाबा, नाशिक-ठाणे हायवे, रांजनोली-भिवंडी बायपास, भिवंडी या ठिकाणी दोन व्यक्तींच्या ताब्यात रु.३१ कोटी ८४ लाख ८० हजार किंमतीचे एकूण १५.९२४ किलो वजनाचा मेफेड्रॉन पावडर (एम.डी.) हा अंमली पदार्थ विक्रीकरीता मिळून आल्याने त्याच्याविरुद्ध कोनगाव पोलीस स्टेशन, भिवंडी येथे दि.१०.०८.२०२५ रोजी गु.र.नं. ४२७/२०२५ एन.डी.पी.एस. ॲक्टचे कलम८(क), २२(क), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकूण १० आरोपींना अटक करण्यात आले असून त्यांच्याविरुद्ध दि.०५.१२.२०२५ रोजी मा. न्यायाधिश,जिल्हा व सत्र विशेष मोक्का न्यायालय, ठाणे येथे दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. सद्यस्थितीत ५ आरोपी जामिनावर असून त्यांना मोक्का अधिनियमान्वये फेरअटक करण्याकरीता मा. अतिरिक्त जिल्हा व सत्र विशेष एन.डी.पी.एस. न्यायालय, भिवंडी यांच्याकडून परवानगी प्राप्त झाली असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

(४) अंशत: खरे आहे.

त्र्यबंकेश्वर जव्हार रोड वरील चिंचुतारा गावाजवळ एका वाहनामध्ये रु.७ लाख ८० हजार ३४० किंमतीचे एकूण १११.४२० किलो ग्रॅम वजनाचे अफू वनस्पतीचे सुकलेले बोंडे चुरा मिळून आल्याने मोखाडा पोलीस स्टेशन येथे दि.२१.०७.२०२५ रोजी गु.र.नं. ११९/२०२५ एन.डी.पी.एस. ॲक्टचे कलम १५(क),८(क) सह भारतीय न्याय संहीता कलम ३१८(४) सह मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात २ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

(५) अंशत: खरे आहे.

सन २०२५ मध्ये रायगड पोलीस घटकाने एनडीपीएस कायद्याच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईत एकूण २६ गुन्हे दाखल केले असून त्यामध्ये एकूण ३२ आरोपीना अटक करण्यात आले आहे. सदर आरोपींकडून ४४.४३१ किलो गांजा, ४.४७६ किलो मेफेड्रोन, २३.८९० किलो चरस व १२.९०३ किलो द्रव व पावडर केटामाईन ड्रग्ज असा एकूण १२३.०८४ किलो अंमली पदार्थ साठा जप्त करण्यात आलेला आहे.

नवी मुंबईतील अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सने वाशी गाव,जुना बस डेपो, वाशी, नवी मुंबई येथे एका व्यक्तीच्या ताब्यात रु.१,४८,८०,०००/- किंमतीचे एकूण १.४८८ ग्रॅम वजानाचा एम.डी. सदृश्य अंमली पदार्थ मिळून आल्याने त्याच्या विरुद्ध वाशी पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे दि.२२.१२.२०२५ रोजी गु.र.क्र.७०१ /२०२५

एन.डी.पी.एस. कायदा कलम ८(क),२२(क),२९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यांत एकूण ५ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

(६) राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी दि.३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली असून ANTF चे सर्व युनिट्स कार्यान्वीत करण्यात आले आहेत.

सन २०२५ मध्ये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) मार्फत एकूण रु.५२३.१७ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ नष्ट करण्यात आले आहेत.

राज्यात सन २०२५ मध्ये अंमली पदार्थ कायद्यांतर्गत सेवनार्थीच्या विरुद्ध १३९५४ गुन्हे दाखल असून १०६८६ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे तसेच अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतुक करणे संदर्भात एकूण ३६५९ गुन्हे दाखल झालेले असून ५३०७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व एकूण रू.१३४०.४१ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.

सन २०२५ मध्ये राज्यात अंमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहिम प्रभावीपणे व नियमीतपणे राबविण्यात आली आहे. तसेच सन २०२६ मध्ये एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अंतर्गत अंमली पदार्थाच्या व्यापारास, प्रसारास व वापरास आळा घालण्यासाठी राज्यभर प्रभावी मोहिम राबविण्याचा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) यांचा संकल्प आहे. त्यानुसार कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

-----------------

## नागपूर व रायगड जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये गावठी व देशी दारूची अवैध निर्मिती व विक्री होत असल्याबाबत

**(९) * २३०४० श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुही (जि.नागपूर) तालुक्यातील अनेक गावांमध्ये अवैधरित्या मोहफुलापासून गावठी दारु तयार करणाऱ्या आरोपी विरोधात माहे जानेवारी २०२६ मध्ये कारवाई केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील अनेक गावांमध्ये हातभट्टी व देशी दारुचे अड्डे राजरोसपणे सुरु असल्याने येथील आदिवासी महिलांनी कर्जत पोलीस ठाण्यावर दिनांक २५ डिसेबर, २०२५ रोजी मोर्चा काढून कारवाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैध दारू विक्रीमुळे तालुक्यातील तरुण पिढी व्यसनाधीन होत असून यामुळे गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे तसेच अनेक कुटुंबांची आर्थिक व सामाजिक घडी विस्कटली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६९ नुसार मोहफुलाची अवैध साठवणूक आणि वाहतूक रोखण्यासाठी स्थानिक पोलीस प्रशासन आणि राज्य उत्पादन शुल्क यांनी संयुक्त मोहीम आखून उक्त तालुक्यातील अवैध व्यवसाय समूळ नष्ट करण्यासाठी येथील परिसरात विशेष गस्त पथक (Flying Squad) नेमण्यासह संबंधित प्रकरणातील मुख्य सूत्रधार व दोषीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कुही (जि.नागपूर) तालुक्यातील गावांमध्ये जानेवारी २०२६ मध्ये पोलीस ठाणे वेलतूर मार्फत मोहफुलापासून गावठी दारु तयार करणाऱ्या विरुद्ध ०१ कारवाई व अन्य ३ कारवाया ह्या देशी दारु विरुद्ध करण्यात आल्या आहेत. सदर एकूण ०४ गुन्हयामध्ये ०६ आरोपीविरुदध कारवाई करण्यात आली आहे. तसेच, जानेवारी २०२६ मध्ये पोलीस ठाणे कुही मार्फत अवैधरित्या देशी दारू विक्री करणाऱ्यांविरुदध ०९ गुन्हे दाखल करून ११ आरोपींविरुदध कारवाई करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे पोलीस ठाणे कुही येथील अवैध दारू विकी करणाऱ्या ०१ आरोपीविरूदध एम.पी.डी.ए. कायद्यान्वये कारवाई करण्यात येवुन दिनाक २५/११/२०२५ रोजी सदर आरोपीस स्थानबद्ध करण्यात आले आहे.

(२) व (३) कर्जत, पोलीस ठाणे जि.रायगड अंतर्गत दारुबंदीच्या अनुषंगाने एकूण ५० केसेस दाखल असून रु.५२,०१०/- इतक्या किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. दि.२२/१२/२०२५ रोजी जागृत कष्टकरी संघटना, रायगड आदिवासी व कातकरी महीला यांनी कर्जत पोलीस स्टेशन येथे आदिवासी पाड्यांतील आणि शेजारच्या गावांतील हात भट्टीची दारू (गावठी) आणि देशी दारु बंद करण्यासाठी निवेदन दिले होते. सदर ठिकाणी पोलीसांनी कारवाई करुन ०३ दारुविक्रेत्यांवर गुन्हे दाखल केले असून हातभट्टी व देशी दारुचे अड्डे यांवर कारवाई करण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यात सन २०२५ मध्ये दारुबंदी कायद्याच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईमध्ये एकूण ६२५ केसेस दाखल केल्या असून रु.८२,७६,५६२/- इतका मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

तरुणाईला व्यसनाधीनतेपासून परावृत्त करण्यासाठी पोलिस प्रशासनाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती मोहिम राबविण्यात येते. तसेच, अवैध दारु विक्रेत्यांवर गुन्हे दाखल करुन प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे करण्यात येतात.

(४) नागपुर ग्रामीण घटकात सन २०२५ मध्ये अवैध दारू वाहतुक करणाऱ्यांविरोधात एम.पी.डी.ए. कायद्यान्वये ०४ कारवाया करण्यात आल्या असुन २३ आरोपींवर हद्दपारीची कार्यवाही करण्यात आली आहे. अवैध व्यवसाय समुळ नष्ट करण्यासाठी कलम ११२ बी.एन.एस. अन्वये कार्यवाही करण्यात येवुन दारू विक्री व वाहतुकीस सहकार्य करणारे यांचा फॉरवर्ड व बॅकवर्ड लींकचा तपास करून अवैध व्यवसाय बंद करण्यासाठी प्रशासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे. सन २०२५ मध्ये उमरेड उपविभागात अवैध दारू विक्री करणाऱ्या ०१ आरोपीचा बाँड रद्द करुन १५,००० रू दंड घेण्यात आलेला आहे. रोहा पोलीस ठाणे, जि.रायगड अंतर्गत गावठी हातभट्टी अवैधपणे विक्री करणाऱ्या ४ इसमांना म.पो.का. ५५ अंतर्गत १ वर्षाकरिता तडीपार करण्यात आले आहे. तसेच कर्जत, नेरळ येथील अवैध गावठी दारु विक्रेत्यांवर तडीपारीची कार्यवाही चालू आहे. महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या अनुषंगाने वेळोवेळी विशेष गस्त पथक नेमण्यात येत असुन सदर पथकामार्फत कारवाई करण्यात येत आहे.

सन २०२५ मध्ये राज्यात दारुबंदी कायद्याअन्वये एकूण १,१३,४९६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच, २३,८०२ प्रतीबंधात्मक कारवाया करण्यात आल्या आहेत.

राज्य उत्पादन शुल्क विभाग व पोलीस प्रशासन यांच्या माध्यमातून मोहफुलाची अवैध साठवणूक व वाहतुक त्याचबरोबर त्याच्या अवैध व्यवसायावर कारवाई करण्यात येत आहे. तसेच, अवैध दारु व्यवसायांवर कार्यकारी क्षेत्रीय अधिकारी, स्थानिक भरारी पथके, विभागीय भरारी पथके यांच्यामार्फत नियमित व प्रभावी कारवाई केली जाते. त्याचप्रमाणे पोलीस विभागाच्या मदतीने व संयूक्त मोहिमेद्वारे सराईत गुन्हेगार व त्यांच्या ठिकाणांवर कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मार्डा (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) येथील कोल माईन्सच्या स्फोटामुळे नागरिकांचे नुकसान व प्रदूषणात वाढ होत असल्याबाबत

**(१०) * २३२१३ श्री.करण देवतळे (वरोरा):**सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मार्डा (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) येथील श्री.गजानन वानखेडे यांचे घर एकोना कोल माईन्सच्या तीव्र स्फोटामुळे पडल्याची घटना दिनांक ११ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल माईन्सच्या स्फोटामुळे घर पडण्याची गेल्या महिन्याभरातील ही तिसरी घटना असून अशा घटना वारंवार घडूनही वेकोलि प्रशासन व जिल्हा प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागात वेकोलिमार्फत ब्लास्टिंग करताना डीजीएमएसच्या नियमावलीचे उल्लंघन केले जात असून ब्लास्टिंगमुळे आसपासच्या परिसरात प्रदूषणात वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित कोल माईन कंपनीवर कारवाई करण्यासह नुकसानग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देऊन प्रदूषण रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई :** (१) कोल माईन्स रेग्युलेशन्स, २०१७ नुसार ब्लास्टींग क्षेत्राकरिता निर्धारित (५०० मीटर) धोकादायक क्षेत्रापासून १७२२ मीटर अंतरावर श्री.गजानन वानखेडे यांचे घर आहे. तसेच डीजीएमएस पडताळणीनुसार दिनांक ११ जानेवारी, २०२६ रोजीची ब्लास्टींग कंपनांची सिस्मोग्राफ यंत्रणावरील नोंद ७६६.८४ मीटर अंतरावर २.२५ मि.मी./सेकंद इतकी असून, ती परवानगी योग्य १० मि.मी./सेकंद मर्यादेपेक्षा कमी असल्याने, एकोना कोल माईन्सच्या तीव्र स्फोटामुळे श्री.गजानन वानखेडे यांचे घर पडले, असे म्हणणे संयुक्तीक ठरणार नाही.

(२) कोल माईन्सच्या ब्लास्टींगमुळे घरे पडली आहेत, अशी कोणतीही अधिकृत तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) कोळसा खाणीमध्ये स्फोट करताना, आयआयटी (बीएचयु) वाराणसी यांच्या वैज्ञानिक अभ्यास अहवालातील शिफारशी तसेच खाण सुरक्षा निदेशालय, यांचेकडील मार्गदर्शक सूचनानुसारच कार्यवाही केली जाते. कोळसा खाण परिसरात प्रदुषणात वाढ होऊ नये, याकरिता पर्यावरण विभागाकडून निश्चित करण्यात आलेल्या मानांकनानुसार, परिसरातील हवेच्या गुणवत्तेचे सातत्याने परिक्षण करणे, वेळोवेळी स्वयंचलीत यंत्राद्वारे तसेच टँकरद्वारे परिसरात पाणी फवारणी करणे, खनिजाची आच्छादित वाहतूक, वृक्ष लागवड, रस्त्यांची देखभाल इ. उपाययोजना खाण परिसरात राबविण्यात येत आहेत. तथापि, या खाणपरिसरात एकूण ०३ सतत वातावरणीय हवा गुणवत्ता केंद्र उभारणे बंधनकारक करण्यात आले होते. त्यानुसार, वेकोलीने ०१ केंद्राची उभारणी केलेली असून, अद्याप ०२ केंद्राची उभारणी केली नसल्याचे आढळून आल्याने, प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून दिनांक १०/०२/२०२६ अन्वये वेकोलीला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी शहर परिसरात उभारण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमेरे यांची देखभाल करण्याच्या कामात संचालकांनी केलेली फसवणूक

**(११)** * **२४२१० श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी (जि.रत्नागिरी) शहर परिसरात उभारण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमेरे यांची देखभाल करुन पुरवठा आदेशाप्रमाणे कामकाजाची पूर्तता करणे बंधनकारक असतानाही प्रोटोकॉल वन इट लॅब्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे संचालक, श्री.हेमंत थावानी व कुलदीप एरम यांनी अटी व शर्तीचा भंग करुन शासनाची फसवणूक केल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कंपनी संचालक यांच्या विरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) प्रोटोकॉल वन आयटी लॅब्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने रत्नागिरी (जि.रत्नागिरी) शहर परिसरात उभारण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमेरे यांची देखभाल करुन पुरवठा आदेशाप्रमाणे कामकाजाची पुर्तता केली नसल्याचे निदर्शनास आल्याने पोलीस अधीक्षक, रत्नागिरी येथील संबंधित पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार कंपनीच्या दोन संचालकांविरूध्द दि. २४/१२/२०२५ रोजी रत्नागिरी शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. ४६७/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ३१८(२), ३१८(३), २२१, २२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

गुन्हा दाखल असलेल्या दोन संचालकांपैकी एका संचालकास दि. ३०/१२/२०२५ रोजी अटक करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी पुढील तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पंचशील नगर झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पात कोट्यवधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार

**(१२)** * **२४८०९ श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पंचशील नगर झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पात ८० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने आशापूरा ग्रुपचे संचालक आणि भागिदारांविरोधात टिळकनगर पोलीस ठाण्यात माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर झोपूयोजनेच्या करारानुसार निधी उभारणे, मंजुरी मिळविणे आणि व्यवस्थापनाची जबाबदारी आशापुरा ग्रुपची असतांनाही त्यांनी पीएनबी हाऊसिंग फायनान्सकडून मिळालेला निधी चुकीच्या माहितीच्या आधारे स्वत:च्या फायद्यासाठी वळविला असून खरेदीदारांकडून मिळालेली रक्कम अधिकृत खात्यांऐवजी अन्यत्र वळविण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

फिर्यादी यांचे फिर्यादीवरुन आशापूरा ग्रुपचे संचालक आणि भागिदारांविरोधात दि.०१/०८/२५ रोजी टिळक नगर पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र. ३९३/२०२५ भादवि कलम ४०६,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तद्नंतर सदर गुन्ह्यामध्ये भादवि कलम ४२० ची वाढ करण्यात आली आहे. तसेच सदर गुन्हा पुढील तपासाकरिता आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे गुन्हा क्र. ६८/२५ अन्वये पुनर्नोंद करून तपास सुरू करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) फिर्यादी यांच्या पार्टनरशिप फर्मने चेंबुर पंचशील नगर येथील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प राबविण्या करीता सन २०११ मध्ये आरोपीतांची फर्म आशापुरा ग्रुप सोबत पार्टनरशिप करार केला. सन २०२१ मध्ये सदर पार्टनरशिप फर्ममध्ये वाद झाल्याने व आरोपींच्या आशापुरा ग्रुपने सदर प्रोजेक्ट पुर्ण करण्यामध्ये असमर्थता दर्शविल्याने सदरचे प्रोजेक्ट फिर्यादी यांच्या अरिहंत रिअल्टर्स यांनी पुर्ण करण्याचे ठरवले.

त्यानुषंगाने फिर्यादी यांच्या ग्रुपने केलेल्या फॉरेन्सिक ऑडीटमध्ये अरिहंत रिअल्टर्सच्या प्रकल्पातील निधी आशापुरा ग्रुपच्या भागीदारांनी वैयक्तिक फायद्यासाठी वळविल्याचे निदर्शनास आले. तसेच PNB हाउसिंग फायनान्सकडून घेतलेले कर्ज बांधकामासाठी न वापरता आरोपीतांनी त्यांचेकडे वळती केल्याचे दिसुन आले. घर खरेदीदारांकडील रक्कम एस्क्रो खात्यात जमा न करता चालू खात्यात घेऊन वापरण्यात आली. तसेच असुरक्षित कर्ज उभारून आर्थिक फायदा घेण्यात आला. यामध्ये आशापुरा ग्रुपचे संचालक व भागीदारांनी संगनमताने सुमारे ७० ते ८० कोटी रुपयांचा अपहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी टिळक नगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

सद्य:स्थितीत सदर गुन्हा पुढील तपासाकरिता आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. तसेच सदर प्रकरणी बीएनएसएस कलम ३५ (३) अन्वये आरोपितांना नोटीस देण्यात आली असून साक्षिदारांचे जबाब, आरोपीतांचे बँकेचे स्टेटमेन्ट यांच्या आधारे आरोपीतांविरुध्द सबळ पुरावा गोळा करणेचे काम चालु आहे. सदरचा गुन्हा हा तपासाधिन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खोपोली (जि.रायगड) येथे एका व्यक्तीची हत्या केल्याबाबत

**(१३) * २३९२६ श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली (जि.रायगड) येथे नवनिर्वाचित नगरसेविकेचे पती श्री.मंगेश काळोखे यांची दिनांक २६ डिसेंबर, २०२५ रोजी निघृण हत्या केल्याची घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेनंतर परिसरात तीव्र संतापाची लाट उसळून स्थानिक नागरिकांनी पोलीस स्टेशन येथे जाऊन आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील घटनेची सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित प्रकरणातील आरोपींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) व (३) होय, हे खरे आहे.

खोपोली नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ करीता दिनांक ०२.१२.२०२५ रोजी मतदान होवून दिनांक २१.१२.२०२५ रोजी मतमोजणी पार पडली होती. प्रभाग क्रमांक २ मधुन नगरसेवक पदाच्या निवडणूकीमध्ये मयत मंगेश काळोखे यांची पत्नी व त्यांच्या विरुध्द मुख्य आरोपी यांची पत्नी उमेदवार होत्या. सदर निवडणुकीमध्ये मुख्य आरोपी यांच्या पत्नी पराभूत झाल्या. त्यातुनच आरोपी यांनी मंगेश काळोखे यांची दिनांक २६.१२.२०२५ रोजी हत्या केली असल्याचे प्राथमिकरित्या निष्पन्न झाले आहे.

सदर घटनेबाबत खोपोली पोलीस ठाणे, जि.रायगड येथे भारतीय न्याय संहिता, सन २०२३ चे कलम १०३(१), ६१(२), १८९(१), १८९(४), १९०, १९१ (३), २३८(अ) सह शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४, २५ अन्वये दिनांक २६.१२.२०२५ रोजी गुन्हा रजि.नं.३६६/२०२५ दाखल करण्यात आला आहे. तसेच नमूद गुन्हयात एकूण १७ आरोपींना अटक करण्यात आली असून १ विधी संघर्षीत बालक यास ताब्यात घेवून बाल सुधारगृहात पाठविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पोशेरी (ता.वाडा, जि.पालघर) येथील महाविद्यालयाच्या वसतिगृहात विद्यार्थिनीला जबरदस्तीने नमाज पडायला लावल्याबाबत

**(१४) * २३०७६ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोशेरी (ता.वाडा, जि.पालघर) येथील एका महाविद्यालयाच्या वसतिगृहात एका विद्यार्थिनीला जबरदस्तीने नमाज पडायला लावल्याची गंभीर घटना माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी विद्यार्थिनीने तक्रार करूनही महाविद्यालयाच्या प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतरही आरोपीला अटक करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करुन शैक्षणिक संस्थांमधील वसतिगृहात अशा धार्मिक सक्तीच्या घटना रोखण्यासाठी आणि विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पोशेरी (ता.वाडा, जि.पालघर) येथील आयडीयल महाविद्यालयाच्या वसतीगृहात जबरदस्तीने नमाज पडायला सांगितल्याची तक्रार एका विद्यार्थीनीने दि. ०५/०१/२०२६ रोजी दाखल केली.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी वाडा पोलीस ठाणे गु. रजि.नं.१०/२०२६ बीएनएस कलम १२६ (२), २९९ सह महा. छळवाद प्रतिबंध अधि. १९९९ चे कलम ४ प्रमाणे दि.०५/०१/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

शैक्षणिक संस्थामधील वसतिगृहात अशा धार्मिक सक्तीच्या घटना रोखण्यासाठी आणि विदयार्थिनींच्या सुरक्षेसाठी पालघर पोलीस घटकात पोलीस काका/पोलीस दिदी पथक स्थापन करण्यात आलेले आहे. सदर पथकातील अधिकारी व अंमलदार हे शाळा-जि.प.शाळा, आश्रम शाळा, खाजगी शाळा, वस्तीगृहे, ट्यूशन, कॉलेज येथे भेटी देवून जनजागृतीचे कार्यक्रम घेतात. प्रत्येक शैक्षणिक संस्थेत 'तक्रार पेटी' लावली असून ती आठवड्यातून एकदा तपासली जाते. तसेच, शाळा प्रमुखांशी संवाद साधून विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या जातात. छेडछाडीच्या तक्रारींसाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात 'खास पथक' तैनात असून, गुन्हा घडल्यास आरोपीवर तात्काळ कारवाई केली जाते. तसेच कारवाई बाबत सदर विदयार्थ्यांच्या पालकांना व संबंधीत संस्थेच्या प्राचार्य व शिक्षकांना लैगिंक आघात व छेडछाड संबंधीत काही माहिती मिळाल्यास पोलीसांना कळविणेबाबत समज देण्यात येते. पीडित मुलींना एकाच छताखाली मानसिक आधार, कायदेशीर मार्गदर्शन आणि पुनर्वसनाची सुविधा मिळण्यासाठी 'भरोसा सेल' (सहायता केंद्र) कार्यरत आहे.

-----------------

## राज्यातील दिव्यांगांच्या शासकीय शाळांना अनुदान व सोयी सुविधा पुरविणेबाबत

**(१५) * २३४८८ श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.सचिन पाटील (फलटण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.राजु तोडसाम (अर्णी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २० दिव्यांगांच्या शासकीय शाळांपैकी ३ शाळा बंद झाल्या असून १७ शाळांच्या ४ कोटी ४७ लाख ८१ हजार ५० रुपये एवढा अनुदानाचा प्रस्ताव दिव्यांग आयुक्तालयाकडून मंत्रालय विभागात पाठविल्यानंतर त्यामध्ये अनेक त्रुटी काढून तो पुन्हा दिव्यांग आयुक्तालयास माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्तालय, पुणे येथे प्रस्ताव सादर करुनही अनुदान मिळत नसल्यामुळे काही शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत तर वेतनेत्तर अनुदान मिळत नसल्याने दिव्यांग विद्यार्थी सोयीसुविधांपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा शासकीय शाळांचे वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी आयुक्तालयाकडून प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविणे आवश्यक असतांना सदरहू प्रस्ताव विहित मुदतीत शासनाकडे सादर केले जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय दिव्यांग शाळांना अनुदान व विद्यार्थ्यांना सोयी सुविधा देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) अंशत: खरे आहे.

आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावात त्रुटी आढळून आल्याने दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या शासन पत्रान्वये त्रुटी पुर्तता करून प्रस्ताव फेरसादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. तदनंतर दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये त्रुटी पुर्तता करुन प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

दिनांक २० जानेवारी, २०२६ रोजीच्या बैठकीत आयुक्त, दिव्यांग कल्याण यांना सर्व शासकीय उपक्रमांच्या वेतनेतर निधी मागणीबाबतचे प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद यांचेमार्फत आयुक्तालयास सादर करण्याच्या तसेच प्रस्तावांबाबत वेळोवेळी आढावा घेण्याबाबत सूचित केले आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यामध्ये एकुण २१ शासकीय संस्था मंजूर असुन त्यापैकी १७ शासकीय संस्था कार्यरत आहेत. शासकीय शाळा / कर्मशाळा मध्ये विद्यार्थ्यांना / प्रशिक्षणार्थींना निवास व भोजनाची विना मुल्य व्यवस्था करण्यात येते, तसेच विद्यार्थ्यांना / प्रशिक्षणार्थींना दैनंदिन जीवनासाठी आवश्यक वस्तु / सोई-सुविधा पुरविल्या जातात.

(३) अंशत: खरे आहे.

शासकीय संस्थांच्या वेतनेत्तर अनुदानाच्या मागणीचे प्रस्ताव दर वर्षी संबंधीत जिल्हा कार्यालयांकडून मागविण्यात येतात व मागणीप्रमाणे निधी वितरण करण्यात येते. तसेच दरवर्षी वार्षिक अंदाजपत्रक निधीची मागणी नोंदविली जाते.

(४) शासकीय संस्थांच्या वेतनेतर अनुदानाच्या प्रस्तावातील त्रुटींची पुर्तता झाल्यानंतर निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे गारगाव (ता.वाडा, जि.पालघर) येथील एका २० वर्षीय आदिवासी तरुणीला विकल्याबाबत

**(१६) * २६०८४ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गारगाव (ता.वाडा, जि.पालघर) येथील एका २० वर्षीय आदिवासी तरुणीला विवाहाच्या नावाखाली ३ लाख रुपयांना विकल्याचा प्रकार दिनांक ८ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तरुणीला जातीवाचक शिवीगाळ, मारहाण, घराबाहेर हाकलणे, तसेच गरोदरपणात व प्रसुतीनंतरही अमानुष वागणूक देण्यात आली असून मूल जबरदस्तीने ताब्यात घेण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणी दोषींवर कारवाई करून पीडित आदिवासी तरुणी व तिच्या अल्पवयीन बाळाच्या सुरक्षितता व पुनर्वसनात्मक उपाययोजना करण्यासह अशा प्रकारच्या मानवी तस्करी, महिला विक्री व आदिवासी महिलांवरील अत्याचारांच्या घटनांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मौजे गारगाव (ता.वाडा, जि.पालघर) येथे मध्यस्थीला रु.३ लाख देऊन फिर्यादी पीडितेचे आरोपीसोबत मे, २०२४ मध्ये लग्न लावून दिल्याचे तसेच आरोपी नवरा व सासू यांचेकडून फिर्यादी तरुणीला जातीवाचक शिवीगाळ, मारहाण, घराबाहेर हाकलणे तसेच गरोदरपणात व प्रसुतीनंतरही अमानुष वागणूक देण्यात आली असल्याची फिर्याद दाखल आहे. सदर फिर्यादीमध्ये आरोपीकडून मुल ताब्यात

देण्याची मागणी पीडितेकडे करण्यात येत असल्याची तक्रार आहे. तथापि, सद्यस्थितीत फिर्यादी ही तिच्या मुलासह तिच्या आईसोबत राहत आहे.

(३) व (४) सदरच्या फिर्यादीस अनुसरून वाडा पोलीस स्टेशन, पालघर येथे गु.र.नं.१३/२०२६, दिनांक ०७/०१/२०२६ रोजी कलम १४३, ८५, ११८(१), ३(५) भा.न्या.सं., सह कलम ३(१)(R)(S) ॲट्रॉसीटी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.

सदर प्रकरणी पीडितेस अर्थसहाय्य देणेबाबत सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, पालघर यांचेद्वारे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्यातील महिला व मुलींच्या अनैतिक मानवी वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे :-

१. अपर पोलीस महासंचालक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे राज्यस्तरीय नोडल अधिकारी करण्यात आले आहे.
२. राज्यात ४५ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षांची स्थापना करण्यात आलेली आहे.
३. हरविलेल्या बालकांच्या शोध घेण्यासाठी राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये "ऑपरेशन मुस्कान" ही शोध मोहीम वेळोवेळी राबविण्यात येत आहे.
४. "अनैतिक मानवी वाहतूक" या विषयावर कायदेशीर मार्गदर्शन होण्याकरीता कार्यरत अधिकारी / अंमलदार यांचेकरीता वेळोवेळी प्रशिक्षण आयोजित करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील विशेषत: पुणे, बुलढाणा, यवतमाळ, नाशिक, धुळे, सांगली, चंद्रपूर, वर्धा, भंडारा, नागपूर तसेच मराठवाडा विभागात अंमली पदार्थ व दारुची विक्री होत असल्याबाबत**

**(१७) * २३२४८ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.राजेश बकाने (देवळी), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्रीमती सई डहाके (कारंजा), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: पुणे, बुलढाणा, यवतमाळ, नाशिक, धुळे, सांगली, चंद्रपूर, वर्धा, भंडारा, नागपूर तसेच मराठवाडा विभागातील काही भागांमध्ये गांजाची अवैध लागवड करुन उत्पादन घेतले जात असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले असून चंद्रपुरसह इतर सीमावर्ती भागात बेकायदेशीर उद्योग सुनियोजित पद्धतीने वाढविला जात असून गरीब व अल्पभूधारक शेतकऱ्यांची शेती बटाईने घेऊन आंध्र प्रदेशातील व्यापाऱ्यांकडून गांजाचे उत्पादन व विक्री केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) हद्दीत हिंजवडी फेज-१ मध्ये एका सोसायटीतील एका घरात हायड्रोपोनिक गांजाची लागवड करुन उत्पादन करुन घेताना खडकी पोलिसांनी धाड टाकून सदर प्रकार उघडकीस आणला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मौजे येवलेवाडी व शिवणीफाटा (ता.कडेगाव, जि.सांगली) येथे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ढाब्यावर व हॉटेलमध्ये विना परवाना अवैध दारु व अंमली पदार्थांची विक्री सुरु असल्याने अंमली पदार्थ व दारुविक्री बंद करण्यासाठी महिलांनी आंदोलनाचा इशारा देत प्रांताधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे, हेही खरे आहे काय,

(४) तसेच, वर्धा जिल्ह्यात दारूविक्री, गांजा तस्करी व अन्य अंमलीपदार्थांची सर्रास विक्री होत असून, कारंजा परिसरात १९२ कोटी रुपयांचा एमडी कारखाना व पुलगाव शहरात २ ग्रॅम ९ मिली ग्रॅम ब्राऊन शुगर जप्त केल्याचे असल्याचे माहे डिसेंबर २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने गत वर्षात महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रदेश आणि पश्चिम बंगाल येथील अंमली पदार्थाचे कारखाने उदध्वस्त करून मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थाचा साठा जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दारू विक्री, गांजा तस्करी व अन्य अंमलीपदार्थांची विक्री करणारे मुख्य सुत्रधार, व्यापारी, मध्यस्थ व संबधित अधिकारी यांच्याविरुद्ध कारवाई करण्यासह अंमली पदार्थाच्या विक्री व साठवणूकीला आळा घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

माहे डिसेंबर २०२५ मध्ये राज्यातील विशेषतः पुणे, बुलढाणा, यवतमाळ, नाशिक, धुळे, सांगली, चंद्रपूर, वर्धा, भंडारा, नागपूर तसेच मराठवाडा विभागातील काही भागांमध्ये गांजाची अवैध लागवड करुन उत्पादन घेतले जात असल्याबाबत १० गुन्हे दाखल असून ८ आरोपींना अटक करण्यात आले आहे. त्यामध्ये रु.२,३८,३५,८३०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

चंद्रपुर जिल्हयात सिमावर्ती भागात बेकायदेशिर भागात उद्योग सुनियोजित पद्धतींने वाढविला जात असलेले गरीब व अल्पभुधारक शेतकऱ्यांची शेती बटाईने घेवून आंधप्रदेशातील व्यापाऱ्यांकडून शेती करण्यात येते; परंतु आजपावेतो आंध्रप्रदेशातील व्यापाऱ्यांकडून गांजाचे उत्पादन व विक्री केल्याबाबत गुन्हे नोंद नाहीत.

(२) होय, हे खरे आहे.

दि.२६.११.२०२५ रोजी सिंबायोसिस कॉलेज हॉस्टेल जवळ रेंजहिल्स पुणे येथे सार्वजनिक रस्त्यावर एका व्यक्तीच्या ताब्यात रु.१६००० किंमतीचा बियाबोंडा सारखा गांजाचा पाला हा अंमली पदार्थ अनाधिकाराने, बेकायदेशीररित्या विक्री करिता ताब्यात बाळगले असल्याचे मिळून आल्याने त्याच्या विरुद्ध खडकी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३३६/२०२५ एन.डी.पी.एस. ॲक्ट चे कलम २(अ), २(ब), २(क), ८(क), २०(अ), २०(ब), २०(२)(ब), २१(अ), २१(ब), २१(क), २२(क), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासात आरोपीकडे मिळून आलेला अंमली पदार्थ हा त्याने एक्सर्बिया टाऊनशिप, हिंजवडी, पुणे येथे राहणाऱ्या दोन व्यक्तींकडून घेतल्याचे सांगितले व सदर दोन्ही व्यक्तींना पोलीसांनी अटक केली असून तपासात ते राहत्या घरात हायड्रोफोनिक गांजाची शेती करीत असल्याचे व त्याकरीता एका रूममध्ये प्लांट उभा केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर ठिकाणी पोलीसांनी कारवाई करुन हायड्रोफोनिक गांजाचा प्लांट उध्वस्त करुन एकूण रु.४४,९७,७९९/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या पुढील तपासात एक्सर्बिया टाऊनशिप, हिंजवडी, पुणे येथे राहणाऱ्या दोन व्यक्तींकडून जप्त केलेला अंमली पदार्थ हा त्यांनी मुंबईतील घाटकोपर येथे राहणाऱ्या एका व्यक्तीकडून घेतल्याचे उघड झाल्याने सदर व्यक्तीस मुंबई येथील राहत्या घरातून अटक करण्यात आली असून एकूण रु.२,८१,६९,५१२/- किंमतीचे अंमली पदार्थ व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. तसेच सदर व्यक्तीस अंमली पदार्थ पुरवणारा त्याचा साथीदारास गोवा येथून ताब्यात घेवून अटक करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत सदर गुन्ह्यात एकूण ५ आरोपींना अटक करण्यात आले असून पाचही आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत व गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(३) अंशत: खरे आहे,

पोलीस अधीक्षक, सांगली यांचे कार्यक्षेत्रातील मौजे येवलेवाडी व शिवणीफाटा (ता.कडेगाव, जि.सांगली) येथे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ढाब्यावर व हॉटेलमध्ये विना परवाना अवैध दारु व अंमली पदार्थाची विक्री सुरु असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

तथापि, मौजे येवलेवाडी व शिवणीफाटा जि.सांगली येथील चार विविध हॉटेल्सवर अवैध दारु विक्रीचे गुन्हे नोंदविण्यात आले असून अन्य ७ व्यक्तींवर अवैधरित्या विक्री उद्देशाने मद्य बाळगल्याचे गुन्हे देखील नोंदविण्यात आले आहेत. खुशबू ढाबा, पैलवान ढाबा, साई गार्डन ढाबा व नवसंग्राम हॉटेल येथे अवैध दारु विक्री होत असल्याबाबत व दारुबंदीसाठी उपसरपंच ग्रामपंचायत, येवलेवाडी ता. कडेगाव, जि सांगली यांनी ग्रामसभा ठराव, दि.२३.१२.२०२५ चा उल्लेख करुन निवेदन दिलेले आहे. सदर निवेदनाची प्रत प्रांताधिकारी कडेगाव, जि.सांगली यांना देण्यात आलेली आहे.

(४) अंशत: खरे आहे.

वर्धा जिल्ह्यात अवैधरित्या होणाऱ्या दारु विक्री संदर्भात राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाई केली असून सन २०२४-२५ मध्ये एकूण ४१८ गुन्हे उघडकीस आणून २५५ व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच रुपये १ कोटी किंमतीचा मुद्देमाल जप्त व नाश केलेला आहे.

तसेच सन २०२५ मध्ये एन.डी.पी.एस. कायद्याअंतर्गत गांजा बाळगणेबाबत ४४ गुन्हे व सेवनार्थींबाबत ११६ गुन्हे, एम डी. बाळगणेबाबत ११ गुन्हे असे एकूण १७१ गुन्ह्यांमध्ये एकूण २१९ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यामध्ये एकूण रु.१,०३,३६,१६०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि.०९.१२.२०२५ रोजी महसूल गुप्तचर संचालनालय (डीआरआय) यांनी “ऑपरेशन हिंटरलँड ब्रू” या सांकेतिक नावाच्या कारवाईत महाराष्ट्रातील वर्धा येथील एक गुप्त मेफेड्रोन उत्पादन युनिट उद्ध्वस्त केले आहे. सदर कारवाईत अंदाजे १९२ कोटी रुपये किंमतीचे १२८ किलो मेफेड्रोन, २४५ किलो प्रिकर्सर रसायने, कच्चा माल आणि संपूर्ण प्रक्रिया सेटअप जप्त करण्यात आला असून मुख्य सुत्रधारासह तीन व्यक्तींना एन.डी.पी.एस. कायदा १९८५ अन्वये अटक करण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदर गुन्ह्यातील तीनही आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

तसेच पुलगाव, जि.वर्धा येथे एका व्यक्तीच्या ताब्यात २.९ ग्रॅम वजनाचा अंदाजे रु.१४,५०० किंमतीचा गरदा (हेरॉईन) हा अंमली पदार्थ अवैधरीत्या मिळून आल्याने त्याच्या विरुद्ध दि.०४.०१.२०२६ रोजी पुलगाव पोलीस स्टेशन येथे अपराध क्र.६०/२०२६ एन.डी.पी.एस. ॲक्ट चे कलम ८(क),२१(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(५) नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने गत वर्षात महाराष्ट्र राज्यात अंमली पदार्थाचे कारखाने उदध्वस्त केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(६) राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी दि.३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली असून ANTF चे सर्व ७ युनिट्स कार्यान्वीत करण्यात आले आहेत.

सन २०२५ मध्ये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) मार्फत एकूण रु.५२३.१७ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ नष्ट करण्यात आले आहेत.

राज्यात सन २०२५ मध्ये अंमली पदार्थ कायद्यांतर्गत सेवनार्थीच्या विरुद्ध १३९५४ गुन्हे दाखल असून १०६८६ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे तसेच अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतुक करणे संदर्भात एकूण ३६५९ गुन्हे दाखल झालेले असून ५३०७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व एकूण रू.१३४०.४१ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.

तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध दारुच्या अनुषंगाने महाराष्ट्र दारुबंदी कायद्याखाली सन २०२५-२६ मध्ये दि.१०.०२.२०२६ अखेर एकूण ६४२२६ गुन्हे नोंद केले असून ६४१६४ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सदर कारवाई मध्ये २१७.२३ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

सन २०२५ मध्ये राज्यात अंमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहिम प्रभावीपणे व नियमीतपणे राबविण्यात आली आहे. तसेच सन २०२६ मध्ये एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अंतर्गत अंमली पदार्थाच्या व्यापारास, प्रसारास व वापरास आळा घालण्यासाठी राज्यभर प्रभावी मोहिम राबविण्याचा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) यांचा संकल्प आहे. त्यानुसार कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

-----------------

## राज्यात वायू प्रदूषण वाढून हवेची गुणवत्ता निर्देशांक धोकादायक पातळीवर पोहोचल्याबाबत

**(१८) * २३२८५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.आदित्य ठाकरे (वरळी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.संजय देरकर (वणी), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: नवी मुंबई, मुंबई, नागपूर जळगाव व वसई विरार या शहरांमध्ये वायू प्रदूषण वाढल्याची व हवेचा गुणवत्ता निर्देशांक धोकादायक पातळीवर पोहोचल्याची बाब माहे जानेवारी २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हवेची गुणवत्ता ० ते ५० दरम्यान चांगली मानली जात असताना ३०० पेक्षा अधिक AQI अत्यंत धोकादायक श्रेणीत येत असल्यामुळे तसेच मोठ्या प्रमाणावरील सुरू असलेली बांधकामे, वाहनांची वाढती वर्दळ,

रस्त्यांवरील धूळ, कचरा जाळणे, बेकऱ्या व औद्योगिक परिसरातून होणारे उत्सर्जन यामुळे प्रदूषण वाढ होऊन संबंधित शहरांतील नागरिकांच्या आरोग्यास, विशेषतः लहान मुले, वृद्ध व श्वसनविकारग्रस्त नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम झाला आहे, हे ही खरे काय,
(३) असल्यास, मुंबई शहरात गेल्या वर्षभरात एक हजार कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या १२५ पेक्षा जास्त बांधकाम प्रकल्पांना परवानगी देण्यात आली असून, त्यापैकी अनेक प्रकल्पांमध्ये वायू प्रदूषण नियंत्रणाच्या नियमांचे उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, मुंबईत माहे नोव्हेंबर/डिसेंबर, २०२५ दरम्यान मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी सुमोटो याचिका दाखल करुन घेतली असता महापालिका प्रशासनाने मा.न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात ६७.८६ टन धुळ यंत्राच्या सहाय्याने झाडणे, काम सुरु असलेल्या १९५४ साईट्स पैकी १०२० साईट्सवर लो-कॉस्ट सेन्सर बसविले असून ३९७ सेन्सर बसविण्याचे काम सुरु असल्याचे दिनांक १५ डिसेंबर, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, मुंबई महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडे बांधकाम धूळ नियंत्रणासाठी परिपत्रक जारी केले असले तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी, सेन्सर अनुपालन, खर्च, नोटिसा, दंड अथवा कारवाईबाबत कोणतीही नोंद उपलब्ध नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदरहू वायू प्रदूषण रोखण्याकरिता बांधकाम स्थळांवर धूळ नियंत्रणासाठी फवारणी, रस्त्यांची नियमित स्वच्छता, प्रदूषणकारी वाहनांवर कारवाई व हरित क्षेत्र वाढविण्याकरिता कार्यवाही करण्यासह बांधकाम प्रकल्पांची पाहणी करुन प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित विकासकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

सतत वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी केंद्रातील मासिक अहवालानुसार हवा गुणवत्ता निर्देशांक प्रामुख्याने समाधानकारक (AQI ५१–१००) ते मध्यम (AQI १०१-२००) श्रेणीत नोंदविला गेला आहे.
(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका व नवी मुंबई महानगरपालिका, आरोग्य विभाग यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार शहरांतील नागरिकांच्या आरोग्यास, विशेषत: लहान मुले, वृध्द व श्वसनविकारग्रस्त नागरिकांच्या आरोग्यावर कोणताही परिणाम झालेला नाही दिसून येत नाही.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवालानूसार नियमांचे पालन न करणाऱ्या बांधकाम प्रकल्पांना प्रारंभी लेखी सूचना (Intimation) दिल्यानंतर, कारणे दाखवा नोटीस आणि काम थांबवण्याची नोटीस देण्यात येत आहे.
(४) हे खरे आहे.
(५) हे खरे नाही.

- माहे जानेवारी २०२६ पर्यत मुंबई शहरातील एकूण २२२४ बांधकामांपैकी १९५२ ठिकाणी लो-कॉस्ट सेन्सर बेस्ड संयंत्रे बसविण्यात आलेली आहे.
- दि.१६/०१/२०२६ रोजी ६७८ बांधकाम प्रकल्पांना सेन्सर अनुपालन नसल्यामुळे ‘कामे थांबवा नोटीस’ बजावण्यात आली आहे.
- माहे ऑक्टोबर २०२५ ते माहे जानेवारी २०२६ पर्यंत, २५ वॉर्डनिहाय भरारी पथकांमार्फत अनधिकृत डेब्रिज वाहतुकीवर प्रतिबंध, रुपये १,२१,२०० इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

- रस्त्यावरील धूळ आटोक्यात आणण्यासाठी माहे ऑक्टोबर २०२५ ते दि.३०/०१/२०२६ पर्यंत सुमारे १४४०८ किलोमीटर लांबीचे रस्ते पाण्याने धुण्यात आले आहेत.

(६) • रस्त्यावरील धूळ आटोक्यात आणण्यासाठी ५ हजार लीटर क्षमतेचे ७२ टँकर्स आणि ९ हजार लीटर क्षमतेचे ५४ टैंकर्स दररोज वापरात येत असून प्रत्येक विभागामध्ये दिवसभर दोन पाळयांमध्ये एकूण २५ मिस्टींग मशीनचा वापर करण्यात येत आहे.

- सर्वकष मार्गदर्शक तत्वांच्या सूचनांच्या अनुषंगाने नियमांचे चे पालन न करणाऱ्या बांधकाम प्रकल्पांना प्रारंभी लेखी सूचना बर (Intimation), दिल्यानंतर 'कारणे दाखवा नोटीस' आणि त 'काम थांबवण्याची नोटीस' देण्यात येत आहे. दि.०१ ऑक्टोबर २०२५ ते दि.३१ जानेवारी २०२६ पर्यंत १९८१ बांधकामांना कारणे दाखवा नोटीस तसेच १०४७ ठिकाणी 'काम थांबवण्याची नोटीस' देण्यात आली असून सदर कार्यवाही सातत्याने सुरू आहे.
- मुंबई शहरातील प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांची अंमलबजावणी सुरु आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र जिल्हा परिषद वित्त व लेखा सेवा वर्ग-३ विभागीय परिक्षा दरवर्षी आयोजित करणेबाबत

**(१९) * २५०४५ श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०१८ मध्ये जिल्हा परिषद वित्त व लेखा सेवा वर्ग-३ ची परिक्षा घेण्यात आली होती त्यानंतर मागील ८ वर्षात सहाय्यक लेखा अधिकारी पदावर पदोन्नतीकरिता परिक्षेचे आयोजन करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिक्षा मागील आठ वर्षात न घेतल्यामुळे जिल्हा परिषदेतील सेवा ज्येष्ठ कनिष्ठ लेखा अधिकारी यांना अटी व शर्तीवर सहाय्यक लेखा अधिकारी पदावर पदोन्नती दिल्याने सदर कर्मचाऱ्यांचे सेवाविषयक नुकसान मोठ्या प्रमाणात होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बहुतांश कर्मचाऱ्यांना सन २०१८ पासून सहाय्यक लेखा अधिकारी पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आलेली आहे परंतु परिक्षा उत्तीर्ण न केल्याने / परिक्षा न झाल्याने त्यांचे नांव सहाय्यक लेखा अधिकारी पदाकरिता ग्राम विकास विभागाद्वारे प्रसिध्द होण्याच्या अंतिम सेवाज्येष्ठता यादीमध्ये अजूनपर्यंत समाविष्ट करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महाराष्ट्र जिल्हा परिषद वित्त व लेखा सेवा वर्ग-३ विभागीय परिक्षा दरवर्षी आयोजित करण्याबाबत वा जिल्हा परिषदा व पंचायत समिती (सेवा व शर्ती) नियम, १९६७ मध्ये सुधारणा करुन परिक्षा रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र जिल्हा परिषद वित्त व लेखा सेवा (वर्ग-३) या पदावरील कर्मचाऱ्यांना वित्त विभागाच्या अखत्यारितील लेखाधिकारी गट-ब या पदावर पदोन्नतीसाठी अनिवार्य असलेली "महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा परीक्षा" महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येत होती. परंतू सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२२.०९.२०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचेमार्फत घेण्यात येणाऱ्या विभागीय परीक्षांचे आयोजन यापुढे प्रशासकीय विभाग स्तरावर करण्याबाबत सूचित करण्यात आले.

यानंतर वित्त विभागाने सदर परीक्षा या संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे स्तरावर आयोजित करण्याबाबत दि.०६.१०.२०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित केला.

तथापि, लेखा व कोषागार कार्यालयाकडून सदर परीक्षेसाठी असलेले विद्यमान शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या दि.३१.०३.२०२१ नुसार सुधारीत करण्याबाबत सूचित केले.

सदर परीक्षेचे अभ्यासक्रम व सर्वसाधारण सूचना या दि.२५.०६.१९८६ व दि.२२.१०.१९९६ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केल्या होत्या. सदर परीक्षेचे अभ्यासक्रम कालबाह्य झाल्याने त्यात सुधारणा करणे आवश्यक होते. त्यास अनुसरून दि.२०.०२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये विभागीय परिक्षेकरीता सामायिक धोरण निश्चित करणे व अभ्यासक्रम सुधारीत करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने दि.१४.०८.२०२५ रोजी अहवाल सादर केला. सदर अहवालातील शिफारशीनुसार सुधारीत अभ्यासक्रम शासन निर्णय दि.१८.०२.२०२६ अन्वये निर्गमित करण्यात आला. सदर सुधारीत अभ्यासक्रमानुसार परीक्षेचे आयोजन करण्याबाबत लेखा व कोषागारे कार्यालयास दि.२०.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत

**(२०) * २४१२८ श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यासह राज्यातील अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेचा लाभ मिळवण्यासाठी पाच एकरपेक्षा अधिक जमिनीची अट अडथळा ठरत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज वितरण कंपन्यांनी नवीन वीज जोडणी देणे बंद केल्यामुळे शेतकऱ्यांना सौर पंपावर अवलंबून राहावे लागत आहे, मात्र ३०० ते ४०० फुटांपेक्षा खोल गेलेल्या भूजल पातळीमुळे जास्त अश्वशक्तीच्या पंपाची गरज असताना कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यांना केवळ ३ अश्वशक्तीचा पंप दिला जात असल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सौर कृषी पंप योजनेतील जमिनीच्या क्षेत्रफळाच्या जाचक अटीमुळे प्रत्यक्ष गरजू शेतकऱ्यांना सिंचनासाठी आवश्यक साधनसामग्री मिळत नाही, ही बाब शासकीय धोरणाच्या अंमलबजावणीतील त्रुटी दर्शवणारी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने सौर कृषी पंप योजनेतील जमिनीची अट शिथिल करून शेतकऱ्यांना त्यांच्या विहिरीच्या खोलीनुसार व गरजेनुसार मोठ्या अश्वशक्तीचे पंप उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

शासन निर्णयातील लाभार्थी निवड निकषाप्रमाणे शेतकऱ्याकडे उपलब्ध असलेल्या जमीनीच्या क्षेत्रानुसार अनुदानावर मिळणाऱ्या पंपाची क्षमता ठरते. २.५ एकर पर्यंत भूधारणा असेल तर ३ एच पी क्षमतेचा, २.५१ ते ५ एकर भूधारणा असेल तर ५ एच पी क्षमतेचा व ५ एकर पेक्षा जास्त भूधारणा असेल तर ७.५ एचपी क्षमतेचा सौर कृषी पंप अनुदानतत्वावर शेतकऱ्याला मिळतो.

(४) विहिरीचा खोलीनुसार व गरजेनुसार मोठ्या अश्वशक्तीचा सौर पंप उपलब्ध करून देण्याबाबत खालील प्रमाणे उपाययोजना केलेली आहे-

अ) सामूहिक जलसिंचन योजनेअंतर्गत दोन किंवा अधिक शेतकरी एकत्र येऊन त्यांच्या एकूण शेती क्षेत्रानुसार आवश्यक असलेली अश्वशक्ती (HP) मोजली जाते. त्या एकत्रित अश्वशक्तीनुसार मोठ्या क्षमतेचा सौर पंप बसवता येतो. या पंपासाठी केंद्र सरकार व राज्य सरकारकडून ९० ते ९५ टक्के अनुदान मिळते.

ब) ७.५ एचपी लाभ घेणाऱ्या शेतकरी लाभार्थ्यांना आवश्यक रकमेचा भरणा करून १० एचपी पर्यंत सौर पंप आस्थापित करण्याबाबत महावितरणचे पत्र दि.०४.०२.२०२५ द्वारे मंजुरी दिली आहे.

क) तसेच सौर पंपाचा शेतकरी लाभार्थ्यांना लाभ घेण्यासाठी सौर बूस्टर, सौर मोनोपोल पंप, सौर तरंगता पंप इत्यादी उपाययोजना केलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्यात गुटख्याचे उत्पादन व विक्री होत असल्याबाबत

**(२१) * २३१२७ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.आशुतोष काळे (कोपरगाव), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.तुकाराम काते (चेंबूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रविंद्र चव्हाण (डोंबिवली), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.राजेंद्र शामगोंडा पाटील (यड्रावकर) (शिरोळ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुटखाबंदी असतांना देखील विशेषत: मुंबई, ठाणे, पालघर, छत्रपती संभाजी नगर, जालना, नांदेड, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यात अवैधरीत्या गुटख्याचे उत्पादन व विक्री सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात गुटखा व तत्सम प्रतिबंधित पदार्थांची पानपट्टीवर विक्री होत असून, ठाणे जिल्ह्यातील भादवड मार्गे कल्याण नाका येथे पोलिसांनी दोन टेम्पो व ट्रकच्या केलेल्या तपासणीत सुमारे ५५ लाखाचा प्रतिबंधित गुटखा दिनांक ७ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास जप्त केला असून, मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वसई-विरार परिसरात लहान-लहान टपऱ्या व छोटे दुकानदार यांचेकडून खुलेआम गुटख्याची विक्री होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच तळेगाव (ता.दिडोंरी, जि.नाशिक) येथील इलाइट क्रॉन इंटरनॅशनल लिमिटेड कंपनीत अन्न व औषध प्रशासनाच्या भरारी पथकाने प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू आणि संबंधित साहित्य जप्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच येसगाव (ता.कोपरगाव, जि.अहिल्यानगर) व कोपरगाव शहरातील मटका व जुगार अड्यावर प्रशिक्षाणार्थी पोलीस उप-अधिक्षक यांच्या विशेष पथकाने दिनांक १ जुलै, २०२५ रोजी धाड टाकून लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, सुमारे २ लाख ५० हजार इतक्या रकमेचा तंबाखू मिश्रीत गुटख्याचा साठा जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच हदगाव (जि.नांदेड) तालुक्यात अवैधरित्या गुटखा उत्पादन व विक्री होत असल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांनी करुनही संबंधित अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, गुटखा व तत्सम प्रतिबंधित पदार्थांची पानपट्टीवर विक्री आढळून आल्यास संबंधित क्षेत्रातील जबाबदार अधिकाऱ्याचे निलंबन करण्याची कारवाई करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व सदर निर्णयाच्या अनुषंगाने राज्यात गुटखा व तत्सम पदार्थांची छुप्या पद्धतीने व अवैध मार्गाने उत्पादन व विक्री, साठा व वाहतूक करणाऱ्या व्यावसायिकांवर तसेच संबंधित क्षेत्रातील जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात अवैध गुटख्या संदर्भात सन २०२५ मध्ये एकूण २४३८ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यापैकी २४१४ गुन्हे उघड झाले असून ३१७३ आरोपींना अटक करण्यात आली आहे आणि एकूण रु.२३९,१०,३७,५०९/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(२) ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाअंतर्गत अवैध प्रतिबंधीत अन्नपदार्थ (गुटखा) वाहतूकीबाबत माहिती प्राप्त झाल्यावर भादवड मार्गे कल्याण नाका येथे पोलिसांनी ३ टेम्पोच्या केलेल्या तपासणीत रु.५४,९९,०००/- इतक्या किमतीचा गुटखा मिळून आल्याने भिवंडी शहर पोलीस ठाणे येथे दिनांक ०२.०१.२०२६ रोजी अन्न सुरक्षा मानके अधिनियम २००६, कलम २६(२)(I), ३(१)(zz)(v), २६(२)(IV), २७(३)(d), २७(३)(e), ५९ तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २२३, २७४, २७५, १२३ अन्वये गुन्हा नोंद क्र. ०४/२०२६ दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ३ आरोपींना अटक करण्यात आली असून सद्य:स्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

तसेच, वसई-विरार परिसरात गुटख्याची विक्री होत असल्याप्रकरणी सन २०२५ मध्ये एकुण ५ गुन्हे दाखल असून, त्यामध्ये ०६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आणि रु.३,८४,४२६/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर ५ गुन्हयाबाबत मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहेत. प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

(३) मे. ईलिटकॉन इंटरनॅशनल लिमिटेड, गट नं ३५२/२, मौजे तळेगाव, ता.दिडोरी, जि.नाशिक याठिकाणी महाराष्ट्र शासनाने उत्पादन, वाहतुक, साठा व विक्रीसाठी प्रतिबंधीत केलेली सुगंधीत तंबाखू व उत्पादनासाठी आवश्यक संबंधित साहित्य मिळून आल्याने, दिंडोरी पोलीस स्टेशन येथे भा.न्या.सं. कलम १२३, २२३, २७४,

२७५, सह अन्न सुरक्षा मानके अधि. २००६ कलम ३०(२)(ए), २६(२)(i), २६(iv), २७(३)(d), २७ (३)(e), ३(१)(zz)(iv), प्रमाणे गुन्हा रजि. नं. ०९/२०२६ दि.०९.०१.२०२६ रोजी नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयात ८ आरोपी निष्पन्न झालेले असून, एका आरोपीस अटक करण्यात आली असून उर्वरीत आरोपींचा शोध सुरु आहे. प्रकरणी एकुण रु.९,०६,२५,४२५/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभाग फिर्यादी आहे. महाराष्ट्र राज्याचे अन्न व सुरक्षा आयुक्त यांचे आदेश क्र.आसुमाअ/अधिसूचना-१४४/२०२५/७ दि.१६.०७.२०२५ अन्वये महाराष्ट्र राज्यात दि.२०.०७.२०२५ पासून पुढे एका वर्षासाठी महाराष्ट्र राज्यात गुटखा, पान मसाला किंवा अंतिमत: गुटखा किंवा पान मसाला गठीत होऊ शकेल असा पदार्थ, सुगंधित किंवा स्वादिष्ट सुपारी/ तंबाखु इत्यादीचे उत्पादन/साठा/वितरण/वाहतूक/तसेच विक्री यावर बंदी घातलेली आहे.

(४) येसगाव (ता.कोपरगाव, जि.अहिल्यानगर) व कोपरगाव शहरातील मटका व जुगार अड्यावर प्रशिक्षाणार्थी पोलीस उप-अधिक्षक यांच्या विशेष पथकाने दिनांक १ जुलै, २०२५ रोजी धाड टाकल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

तथापि, प्रशिक्षणार्थी पोलीस उप अधीक्षक यांच्या विशेष पथकाने दि.८ जुलै, २०२५ रोजी समृध्दी महामार्गावर कोपरगांवकडे जाणाऱ्या टोलनाक्याजवळ छापा टाकुन रु. ७६,८०,०००/- किंमतीचा मुद्देमाल (पानमसाला, सुगंधीत तंबाखु व आयशर टेम्पो) जप्त केला आहे. त्यानुषंगाने, कोपरगांव शहर पोलीस स्टेशन येथे भा.न्या.सं. कलम १२३, २२३, २७४, २७५ सह अन्न व सुरक्षा मानके अधि, २००६ चे कलम २६(२)(iv), २७(३)(डी), २७(३)(इ), ३०(२)(ए), ३(१)(zz)(iv), ५९ प्रमाणे दि. ८ जुलै, २०२५ रोजी गु.र.नं. ३६२/२०२५ दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात २ आरोपी निष्पन्न असून १ आरोपीस अटक करण्यात आली आहे व अन्य आरोपीचा शोध सुरु आहे.

(५) हदगाव (जि.नांदेड) तालुक्यात अवैधरित्या गुटखा उत्पादन व विक्री होत असल्याच्या तक्रारी सन २०२५-२६ मध्ये स्थानिकरित्या नागरिकांकडून पोलीस प्रशासनास प्राप्त नाहीत.

(६) व (७) अन्न व औषध प्रशासनामार्फत राज्यात अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखू, सुगंधित सुपारी व तत्सम पदार्थाच्या उत्पादन, साठा, विक्री, वाहतूक (महाराष्ट्र राज्यामध्ये व राज्यातून), वितरण करण्यास दि.२०.०७.२०१२ पासून दरवर्षी १ वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिबंध घालण्यात येत आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत दि.१६.०७.२०२५ चे आदेश लागू असून त्यानुसार, गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखू, सुगंधित सुपारी व तत्सम पदार्थ या अन्न पदार्थाची उत्पादन, विक्री, वितरण, साठा, वाहतूक (महाराष्ट्र राज्यामध्ये व राज्यातून) करणाऱ्या व्यक्तिवर नियमितपणे कारवाई करण्यात येते. त्यानुसार, सन २०२१ ते सन २०२५ अखेर पोलीस प्रशासनाकडून करण्यात आलेल्या कारवाईची संख्यिकीनिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| **वर्ष** | **दाखल गुन्हे** | **उघड गुन्हे** | **अटक आरोपी** | **प्रतिबंधक कारवाई** |
|---|---|---|---|---|
| **२०२१** | २६९७ | २६९४ | ३९३४ | १५५७ |
| **२०२२** | २३८७ | २३७८ | ३३३२ | १३९७ |
| **२०२३** | ३४७७ | ३४६९ | ४३९४ | २३११ |
| **२०२४** | २७८४ | २७७७ | ३६६८ | २०१५ |
| **२०२५** | २४३८ | २४१४ | ३१७३ | १७०६ |

-----------------

## तासगाव (जि.सातारा) येथे आय.एस.ए.एस. महाविद्यालयात शिकणाऱ्या मुलीचा झालेला संशयास्पद मृत्यू

**(२२) * २३३११ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तासगाव (जि.सातारा) येथील आय.एस.ए.एस महाविद्यालयात ब्युटीशिअनचा अभ्यासक्रम शिकणाऱ्या व अक्षया सोसायटी, कोरेगाव पार्क, पार्क लेन नं.५, पुणे येथे ३ मुलींसमवेत पीजी मध्ये राहणाऱ्या कु.सिध्दी सचिन गंधाले या मुलीचा दिनांक १३ जुलै, २०२५ रोजी वा त्यासुमारास घरामध्ये मृतदेह आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी श्री.ज्ञानमित्र बंधली या व्यक्तीने तिच्या भावनांचा गैरवापर (Emotional Blackmail) केला असून, त्याच्याविरुद्ध तिची मैत्रिण जबाब देत असतांना तिचा जबाब न नोंदविणे, मुलीचे आई-वडील सदर संशयास्पद मृत्युची चौकशीसाठी कोरेगाव पोलीस ठाण्यात गेले असता पोलीस अधिकारी, श्री.सुनिल थोपटे व श्रीमती जाधव यांनी मुलीच्या आई-वडिलांना उडवा-उडवीची उत्तरे देऊन उक्त प्रकरण दडपून टाकले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त संशयास्पद घटना ही घातपाताची असतांनाही त्याची सखोल चौकशी न करता कोरेगाव पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी आत्महत्या केल्याचा गुन्हा नोंदवून अन्याय केला असल्याने निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने विशेष तपास पथकामार्फत (SIT) चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर घटनेच्या अनुषंगाने, कोरेगाव पार्क, पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भारतीय न्याय संहितेचे कलम १०८, ३(५) अन्वये दि.२७.०८.२०२५ रोजी गु.र.नं ०८६/२०२५ नोंदविण्यात आला आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी मयत मुलीच्या मैत्रीणीचा जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविण्यात आला आहे.

घटनेनंतर कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन येथे अकस्मात मयत रजि. नं. २२/२०२५ प्रमाणे अकस्मात मयत नोंद करण्यात आली होती. सदर अकस्मात मयत प्रकरणाचा तपास सुरू असताना, मयत मुलीचे वडील यांनी दिलेल्या तक्रारीवरून दि.२७.०८.२०२५ रोजी गुन्हा रजि. नं. ८६/२०२५ भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम १०८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्याअनुषंगाने, दोन आरोपींना अटक करून त्यांच्याविरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

तसेच सदर प्रकरणी, ससून हॉस्पिटल, पुणे येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रानुसार मयताचे मृत्यूचे कारण “Hanging associated with evidence of alcohol consumption” असे नमूद करण्यात आलेले आहे

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: मुंबई, नवी मुंबई, रायगड, नागपूर व छत्रपती संभाजीनगर शहरात अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याबाबत

**(२३) * २३२६५ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव),**

**श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२४-२०२५ या कालावधीत एकूण ३७ हजार ६९५ मुली आणि महिला बेपत्ता झाल्या असून त्यातील ४ हजार ९६ मुली अल्पवयीन आहेत तर ३३ हजार ५९९ महिला सज्ञान असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२४-२०२५ या दोन वर्षाच्या कालावधीत रायगड जिल्ह्यात ७० अल्पवयीन मुली बेपत्ता, नवी मुंबई शहरात सुमारे ४९९ अल्पवयीन मुले-मुली, मुंबईमध्ये ८२ मुले, छत्रपती संभाजीनगर शहरात वाळूज परिसरात ३ महिला व ३ तरुणी व नागपूर शहरात ५ हजार ८९७ बेपत्ता झाल्याच्या तक्रारी प्राप्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणांमध्ये १५ ते १८ वयोगटांतील मुले-मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण सर्वाधिक असून अद्यापपर्यंत त्यांचा शोध लागला नसल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात अनेक ठिकाणी नवजात मुलांची विक्री करणाऱ्या टोळया कार्यरत असून माहे डिसेंबर, २०२५ मध्ये बदलापूर शहरातील एका दलाल महिलेसह काही जणांना पोलिसांकडून अटक करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने पोलीस यंत्रणेकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना, गस्त वाढविणे, सीसीटीव्ही तपासणी व मुलींच्या सुरक्षेसाठी विशेष पथक नेमण्यासह भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र राज्यात सन २०२४-२५ मध्ये बेपत्ता व मिळून आलेल्या महिला व अल्पवयीन मुलींची माहिती पुढीलप्रमाणे:-

| वर्ष | **हरविलेल्या महिला** | **मिळुन आलेल्या महिला** | **हरविलेल्या मुली (अल्पवयीन)** | **मिळुन आलेल्या मुली (अल्पवयीन)** |
|---|---|---|---|---|
| **२०२४** | ४५६६२ | ३०८७७ | ११३१६ | ८४७५ |
| **२०२५** | ४८२७८ | ३६५८१ | १२११३ | १०२९५ |

(२) सन २०२४-२०२५ या वर्षांत रायगड जिल्ह्यात हरविलेल्या व मिळुन आलेल्या अल्पवयीन मुलींची माहिती खालीलप्रमाणे:-

| वर्ष | **हरविलेल्या अल्पवयीन मुली** | **मिळुन आलेल्या अल्पवयीन मुली** |
|---|---|---|
| **२०२४** | १०२ | १०२ |
| **२०२५** | ७० | ६६ |

२. मुंबई शहर, पोलीस आयुक्तालया अंतर्गत हरविलेल्या व मिळुन आलेल्या अल्पवयीन मुला/मुलींची माहिती खालीलप्रमाणे:-

| **वर्ष** | **हरविलेल्या** | | **मिळुन आलेल्या** | |
|---|---|---|---|---|
| | **मुले** | **मुली** | **मुले** | **मुली** |
| **२०२४-२५** | १४३५ | ३०८० | १४०९ | ३०४६ |
| **एकूण** | ४५१५ | | ४४५५ | |

३. नवी मुंबई, पोलीस आयुक्तालया अंतर्गत हरविलेल्या व मिळुन आलेल्या अल्पवयीन मुले/मुलींची माहिती खालीलप्रमाणे:-

| **वर्ष** | **हरविलेल्या** | | **मिळुन आलेल्या** | |
|---|---|---|---|---|
| | **मुले** | **मुली** | **मुले** | **मुली** |
| **२०२४** | १५१ | ३०४ | १४६ | ३०० |
| **२०२५** | १७२ | ३४७ | १६७ | ३२७ |

४. छत्रपती संभाजीनगर, पोलीस आयुक्तालया अंतर्गत हरविलेल्या व मिळुन आलेल्या महिला व अल्पवयीन मुलींची माहिती खालीलप्रमाणे:-

| **वर्ष** | **हरविलेल्या महिला** | **मिळुन आलेल्या महिला** | **हरविलेल्या मुली (अल्पवयीन)** | **मिळुन आलेल्या मुली (अल्पवयीन)** |
|---|---|---|---|---|
| **२०२४** | ३० | २३ | **५** | ४ |
| **२०२५** | २२ | १९ | १७ | १० |

५. नागपूर, पोलीस आयुक्तालया अंतर्गत हरविलेल्या व मिळुन आलेल्या महिला व अल्पवयीन मुलींची माहिती खालीलप्रमाणे:-

| **वर्ष** | **हरविलेल्या महिला** | **मिळुन आलेल्या महिला** | **हरविलेल्या मुली (अल्पवयीन)** | **मिळुन आलेल्या मुली (अल्पवयीन)** |
|---|---|---|---|---|
| **२०२४** | १९०४ | १७२८ | ३७० | ३५२ |
| **२०२५** | १८७५ | १७०४ | ३९१ | ३७१ |
| एकूण | ३७७९ | ३४३२ | ७६१ | ७२३ |

(३) बेपत्ता व शोषित मुलांचा शोध घेऊन त्यांना पालकांच्या स्वाधीन करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात जुलै, २०१५ ते डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत एकूण १३ “ऑपरेशन मुस्कान” राबविण्यात आले आहेत. सध्या दिनांक २०.०१.२०२६ ते दिनांक २०.०२.२०२६ कालावधीत ऑपरेशन मुस्कान १४ चालु आहे.

तसेच सन २०२४ व २०२५ मध्ये १५ ते १८ वयोगटातील हरविलेल्या व मिळून आलेल्या मुला/मुलींची माहिती खालीलप्रमाणे:-

| घटकाचे नाव | वर्ष | हरविलेले बालके | | मिळुन आलेले बालके | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | मुले | मुली |
| मुंबई शहर | २०२४ | ९८ | ४९८ | ९२ | ४९१ |
| | २०२५ | १७९ | १७२३ | १७१ | १७१६ |
| नवी मुंबई | २०२४ | १३१ | २८७ | १२१ | २७८ |
| | २०२५ | १५० | ३२७ | १४२ | ३०७ |
| रायगड | २०२४ | २६ | ९२ | २३ | ८७ |
| | २०२५ | २३ | ७९ | १९ | ७१ |
| नागपूर शहर | २०२४ | ११५ | ३६३ | ११३ | ३५५ |
| | २०२५ | ८४ | २९८ | ८१ | २७२ |
| छ.संभाजी नगर | २०२४ | ६४ | १७१ | ५८ | १६२ |
| | २०२५ | ७९ | २०२ | ६९ | १८५ |
| | **एकूण** | **४९८९** | | **४८१३** | |

थोडक्यात, सन २०२४ व २०२५ मध्ये १५ ते १८ वयोगटातील हरवलेल्या मुला-मुलींपैकी ९६% पेक्षा जास्त मुले व मुली मिळून आल्या आहेत.

(४) राज्यामध्ये नवजात बालक विक्री बाबत पोलीस अधीक्षक चंद्रपूर, पोलीस आयुक्त मुंबई शहर, ठाणे शहर, पुणे शहर, पिंपरी चिचंवड अशा एकुण ०५ पोलीस घटकात ०५ गुन्हे दाखल आहेत.

तसेच, नवजात बालक विक्री बाबत डिसेंबर २०२५ मध्ये पोलीस आयुक्तालय ठाणे अंतर्गत बदलापुर पश्चिम, पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता कलम १४३, ३(५) सह जुवेनाईल जस्टीस ॲक्ट, २०१५ कलम ८१, ८७ व माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० कलम ६६ (ड) अन्वये गु.र.नं. ४०९/२०२५ दिनांक २४.१२.२०२५ रोजी नोंदविण्यात आला आहे. यामध्ये एकूण ६ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

(५) हरविलेल्या महिला व बालकांचा शोध घेण्यासाठी दिनांक १५/०४/२०२५ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले असून त्यानुसार सर्व घटकांमध्ये मिसिंग सेल कार्यरत करण्यात आले आहेत. मिसिंग सेलकडून ऑपरेशन शोध १ व ऑपरेशन शोध २ या विशेष मोहिमा राबविण्यात आल्या असून त्यामध्ये एकूण ५०६६ महिला व २७७१ बालके यांचा शोध घेण्यात आला आहे.

हरविलेल्या मुला/मुलींच्या शोधासाठी महाराष्ट्र राज्यात जुलै २०१५ ते डिसेंबर २०२४ अखेर १३ ऑपरेशन मुस्कान राबविण्यात आली असून त्यामध्ये ४११९३ लहान मुले/मुली यांचा शोध घेण्यात आला आहे. सध्या २० जानेवारी ते २० फेब्रुवारी दरम्यान ऑपरेशन मुस्कान १४ मोहिम सुरू असून दिनांक १६/०२/२०२६ पर्यंत ४५४ मुले व ९४७ मुली अशी एकूण १४०१ बालके शोधण्यात आलेली आहेत.

बालकांवरील शाळांमधील अत्याचार रोखण्यासाठी दिनांक १२/०२/२०२६ अन्वये शाळांचे Safety Audit करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

स्त्रिया, मुले व नवजात बालके यांच्या तस्करीस प्रतिबंध करण्यासाठी गृह विभाग शासन निर्णय क्र. पीपीए-१०२०/प्र.क्र. २६९/विशा-६ दिनांक २५/०८/२०२१ अन्वये राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये (रेल्वे वगळून) ४५ Anti Human Trafficking Cell स्थापन करण्यात आले आहे. लहान मुलांवरील लैंगिक अत्याचारांना आळा घालण्यासाठी पोलीस काका व पोलीस दिदी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नद्यांमधील वाढते प्रदूषण रोखण्याबाबत

**(२४) * २२९७७ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पुणे, मुंबई, पालघर, नाशिक, नागपूर, सोलापूर जिल्ह्यातील नद्यांमधील सर्वाधिक प्रदुषित जलपट्टे असल्याचे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालावरुन निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथील नागनदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी केंद्र शासनाने २०२२ मध्ये १,९२७ कोटी रुपये मंजूर केले असतानाही माहे जानेवारी, २०२६ पर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरुवात न होता केवळ कागदोपत्री प्रगती दाखविली जात असून शहरातील १३ पैकी ११ सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) बंद असल्याने प्रक्रिया न केलेले पाणी नाग नदीतून वाहून गोसीखुर्द प्रकल्पात मिसळून प्रदूषण वाढत आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, चांदोरी, सायखेडा व करंजगाव (ता.निफाड, जि.नाशिक) परिसरात गोदावरी नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर पानवेली वाढल्या असून लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी करूनही प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे नदीचे प्रदूषण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, पंढरपूर (जि.सोलापूर) येथील चंद्रभागा नदीत प्रक्रिया न केलेले सांडपाणी सोडल्यामुळे पाणी दूषित होऊन मासे मृत्युमुखी पडल्याचे निदर्शनास आले असून इस्कॉन घाटाजवळील वार्षिक २९ कोटी रुपये खर्चाची ‘सेबर टेक्नॉलॉजी’ कुचकामी ठरल्याने वारकरी भाविकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, डहाणू (जि.पालघर) येथील कंक्राडी नदीतील प्रदूषणाबाबतचा खटला मागील आठ वर्षांपासून प्रलंबित असून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एम.पी.सी.बी.) याबाबत आवश्यक पाठपुरावा न केल्यामुळे खाडी, भूजलसाठे तसेच परिसरातील पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम होवून नदी प्रदूषणात वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नदी शुद्धीकरणासाठी व नद्यांचे प्रदूषण रोखण्याकरिता कार्यवाही करण्यासह संबंधित महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दोषी अधिकाऱ्यांवर व प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांच्याकडून प्राप्त दि.०६.०२.२०२६ रोजीच्या अहवालानुसार सन २०२४-२०२५ या वर्षात फेब्रुवारी ते मार्च महिन्याच्या कालावधीत ग्रामपंचायत चांदोरी, सायखेडा व करंजगाव (ता. निफाड, जि. नाशिक) यांच्यामार्फत गोदावरी नदी पात्रातील काही प्रमाणात पानवेली काढण्याची कार्यवाही करण्यात आली असल्याचे नमूद केले आहे. तसेच २०२६ मधील येणाऱ्या पावसाळयानंतर पानवेली काढण्याचे नियोजन केलेले असून त्यासाठी आवश्यक निधीचा प्रस्ताव जिल्हा परिषद, नाशिक यांनी जिल्हाधिकारी, नाशिक यांना सादर केलेला आहे.

(४) पंढरपूर नगरपरिषदेमार्फत पंढरपूर मंदिर परिसराजवळील चंद्रभागा नदी स्वच्छ करणेसाठी सेबर टेक्नॉलॉजी वर आधारित विकेंद्रीत सांडपाणी प्रकीया प्रकल्पाचे काम सुरू असुन सद्य:स्थितीत सदरचा प्रकल्प पुर्ण क्षमतेने कार्यान्वित झालेला नाही. सदर सेबर टेक्नॉलॉजी प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर व पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर कंत्राटदारास सदर कामाचे देयक अदा करण्यात येईल, असे पंढरपूर नगर परिषदेने दि.१२.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. पंढरपूर शहरातील सर्व सांडपाणी प्रक्रिया केंद्रे सुरु आहेत. मत्स्य विभागाच्या दि. ०९.०२.२०२६ रोजीच्या पत्रानुसार चंद्रभागा नदीमध्ये मासे मृत्युमुखी पडलेले नाहीत.

जिल्हा आरोग्य अधिकारी, सोलापूर यांच्या दि. १७.०२.२०२६ रोजीच्या अहवालानुसार चंद्रभागा नदीच्या पाण्यामुळे परिसरात जलजन्य आजाराची कुठल्याही प्रकारची साथ अथवा रोगाचा प्रादूर्भाव झालेला आढळून आलेला नाही.

(५) कंक्राडी नदी समुद्राला मिळण्यापूर्वी डहाणू नगरपरिषद हद्दीतून सुमारे २.५० कि.मी. लांबीची आहे व त्यापुढे सावटा नावाच्या खाडीतून अरबी समुद्रास जाउन मिळते. कंक्राडी नदी ही अत्यंत छोटी व हंगामी नदी आहे. त्यामुळे नदीमध्ये पाण्याचा प्रवाह नसतो. कंक्राडी नदीवर धरण देखील नाही व या नदीचे पाणी पिण्यासाठी वापरले जात नाही. डहाणू नगरपरिषद हद्दीमध्ये कंक्राडी नदी लगत दोन्ही तीरावर निवासी संकुल अस्तित्वात आहेत. कंक्राडी नदीपात्रालगत कुठल्याही प्रकारचे कारखाने अस्तित्वात नाहीत. डहाणू नगरपरिषदेच्या हद्दीत रहिवासी वस्त्यांमधुन घरगुती सांडपाणी विना प्रक्रिया कंक्राडी नदीत मिसळते. कंक्राडी नदीमध्ये घरगुती सांडपाणी विना प्रक्रिया सोडत असल्याकारणाने २०१७ साली महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने डहाणूनगरपरिषदे विरुद्ध तालुका सत्र न्यायालय, डहाणू येथे खटला दाखल केला असून तो सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील कृषी विभागात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याचे गृह विभागाने दिलेले आदेश

**(२५) * २३००६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील कृषी विभागात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांनी बेकायदेशीरपणे सुरू केलेल्या खाजगी कंपन्यांची तसेच कृषी उपसंचालक, श्री.किरण जाधव यांच्या मालमत्तेची चौकशी सुरु करावी असे आदेश गृह विभागाने महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांना दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी सुरु न केल्यामुळे लोकप्रतिनिधी यांनी पोलीस महासंचालक यांना पत्र देऊन तक्रार केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी गृह विभागाने दिलेल्या आदेशानुसार व लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी दिनांक २६.०८.२०२५ च्या शासन पत्रान्वये चौकशी करण्याच्या सूचना महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभागास देण्यात आलेल्या आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०७.१०.२०२५ च्या पत्रान्वये या प्रकरणात तपास अधिकारी कोण आहेत याबाबत विचारणा केलेली आहे.

(३) लोकप्रतिनिधी यांच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत दिनांक ०८.१०.२०२५ रोजीच्या आदेशान्वये श्री.किरण शामराव जाधव यांच्या मालमत्तेची उघड चौकशी सुरु केली आहे.

(४) श्री.किरण शामराव जाधव यांच्याविरुध्द दिनांक १८.०७.२०२५ च्या ज्ञापनाद्वारे कृषी विभागामार्फत विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील मल्टिस्टेट व पतसंस्थांमध्ये असलेल्या ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यात कसूर केल्याबाबत

**(२६) * २३८०२ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.विजयसिंह पंडित (गेवराई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ (एमपीआयडी) अन्वये ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यास कसूर करणाऱ्या वित्तीय संस्थांविरुध्द दाखल गुन्ह्यांमधील प्रकरणांच्या सुनावणीसाठी विशेष न्यायालय स्थापन करण्याबाबत जिल्हा दंडाधिकारी, बीड यांनी अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यातील २५०० कोटी रुपयांच्या ठेवी परत करण्यास कसूर करणाऱ्या वित्तीय संस्थांविरुध्द दाखल गुन्ह्यात २५० हून अधिक जप्त मालमत्तांचा लिलाव करून निधी उपलब्धतेबाबत केवळ स्वतंत्र न्यायालय नसल्यामुळे विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन एमपीआयडी कायद्यातील कलम ६ (१) नुसार उक्त प्रकरणांची व्याप्ती लक्षात घेऊन विविध वित्तीय संस्थांनी ठेवीदारांची फसवणुक करून ठेवी परत करण्यात कसूर केल्याप्रकरणी MPID विशेष न्यायालय स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच या प्रकरणातील गुन्हा नोंदविण्यात आलेल्या संबंधितांच्या मालमत्ता जप्त करुन अथवा थकीत कर्जे वसुल करून ठेवीदारांचा निधी परत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तिय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ मधील तरतूदीनुसार बीड जिल्हयात दाखल झालेल्या प्रकरणांची संख्या व व्याप्ती विचारात घेता सदर प्रकरणांना गती देण्यासाठी उक्त कायद्याच्या कलम ६ (१) मधील तरतूदीनुसार विशेष न्यायालयाची स्थापना करण्याची विनंती पोलीस अधिक्षक, बीड यांनी दि.१४.१२.२०२५ च्या पत्रान्वये शासनास केली आहे. त्यानुषंगाने बीड जिल्हयातील प्रकरणांची संख्या विचारात घेता ठेवीदारांना न्याय देण्यासाठी विशेष न्यायालय स्थापन करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तिय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ मधील कलम ६ (१) मधील तरतुदीनुसार बीड जिल्हयामध्ये विशेष न्यायालयाची स्थापना करण्यासाठी मा.मुख्य न्यायाधीश, उच्च न्यायालय, मुंबई यांची सहमती प्राप्त करुन पुढील कार्यवाही करण्यासाठी विधी व न्याय विभागामार्फत मा. उच्च न्यायालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात करण्यात आला आहे.

(४) बीड जिल्हयातील वित्तिय संस्थांनी केलेल्या आर्थिक गैरव्यवहाराच्या अनुषंगाने संबंधित संस्थांच्या मालमत्ता जप्त करणे तसेच जप्त केलेल्या मालमत्तांची विक्री करुन ठेवीदारांना त्यांचे पैसे परत करण्याच्या अनुषंगाने दि.१९.०८.२०२५ रोजी अप्पर मुख्य सचिव, गृह यांच्या दालनात बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत बीड जिल्हयातील लोकप्रतिनीधी उपस्थित होते. बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार उक्त कायद्याअंतर्गत बीड जिल्ह्यातील प्रकरणांमध्ये जप्त मालमत्तांची विक्री करुन ठेवीदारांचे पैसे परत करण्यासाठी स्वतंत्र उपजिल्हाधिकारी याची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तिय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ मधील तरतूदीनुसार गुन्हा दाखल झालेल्या प्रकरणांपैकी ५ प्रकरणी उक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार मालमत्ता जप्तीच्या अधिसुचना शासनाद्वारे निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीत (जि. रत्नागिरी) इटलीमध्ये प्रदूषणामुळे बंद पडलेली मिटेनी एस.पी.ए. ही रासायनिक कंपनी सुरु केल्याबाबत

**(२७) * २३५६२ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीत इटलीतून हद्दपार केलेली "मिटेनी एस.पी.ए." ही घातक रासायनिक कंपनी "लक्ष्मी ऑरगॅनिक" या नावाने सुरू करण्यात आली असल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर केमिकल कंपनीमधून 'पीएफएएस' या अत्यंत घातक विषारी रासायनिक पदार्थाचं उत्पादन घेतले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पामुळे भूगर्भातील पाणी आणि मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याने प्रकल्प बंद करण्याची मागणी स्थानिक नागरीक, पर्यावरण संस्था आणि कायदेतज्ज्ञांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, माधव गाडगीळ समिती, कस्तुरीरंगन समिती तसेच महाराष्ट्र शासनाच्या राणे समितीच्या शिफारशींचा संदर्भ देऊन पश्चिम घाट आणि कोकणातील पर्यावरणीय समतोल आणि मानवी आरोग्याला दीर्घकालीन धोका निर्माण करणा-या येथील रासायनिक उद्योगांवर कठोर निर्बंध घालण्याची गरज आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित कंपनी बंद करुन सदर कंपनीस राज्यात व मानवी वस्ती नजीक परवानगी देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह पीएफएएस या अत्यंत घातक रसायनांचे उत्पादन कायमस्वरूपी बंद करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) इटलीमधून हद्दपार केलेली 'मिटेनी एस.पी.ए.' ही रासायनिक कंपनी 'लक्ष्मी ऑरगॅनिक' या नावाने सुरू करण्यात आली असल्याबाबतची माहिती उपलब्ध नाही. तथापि, मे. लक्ष्मी ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लिमिटेड हा उद्योग प्लॉट क्रमांक जी-६०, औदयोगिक वसाहत लोटे, ता. खेड, जि. रत्नागिरी येथे कार्यरत असून सदर उद्योगाने दि. ३१.०३.२०२० च्या पत्रान्वये स्पेशॅलिटी इंटरमीडिएट्सच्या ८५०० मेट्रिक टन प्रति वर्ष इतक्या प्रस्तावित उत्पादनासाठी पर्यावरणीय मंजुरी मिळवली आहे. तद्नंतर उद्योगाने प्रकल्प उभारणी करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिनांक २२.०२.२०२१ रोजी संमतीपत्र प्राप्त केले. तद्नंतर सदर उद्योगासाठी प्राप्त पर्यावरण अनुमतीचे हस्तांतरण मे. लक्ष्मी ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लिमिटेड यांचेकडून मे. यलोस्टोन फाइन केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड यांचे नावे दि.०९.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आले. त्यानंतर उद्योगाने मे. यलोस्टोन फाइन केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड या नावाने उत्पादन सुरु करण्यासाठी दिनांक ११.०७.२०२३ रोजी संमती पत्र प्राप्त केले असून ते ३०.०६.२०२६ पर्यंत वैध आहे.

सदर उद्योगाला विद्यमान स्पेशॅलिटी इंटरमीडिएट्सच्या विस्तारासाठी राज्यस्तरीय पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाकडून दिनांक १३.१०.२०२३ च्या पत्राद्वारे संदर्भ अटींचे (ToR) पत्र प्राप्त झाले. तदनंतर उद्योगाने विस्तारासाठी Consent to Establish साठी अर्ज केला आणि दिनांक ०६.०८.२०२५ रोजी संमतीपत्र प्राप्त केले. उद्योगाने मेसर्स यलोस्टोन फाइन केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड या नावाने दिनांक २०.०९.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे उत्पादन क्षमतेच्या विस्तारासाठी पर्यावरण मंजुरी मिळवली आहे.

उद्योगाने केलेल्या अर्जानुसार, दिनांक ११.०९.२०२५ द्वारे मे. यलोस्टोन फाइन केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेडचे नाव बदलून मे. लक्ष्मी ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लिमिटेड असे करण्यासाठी संमतीपत्रा मध्ये सुधारणा करण्यात आली. आता, मे. यलोस्टोन फाइन केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या नावे प्राप्त उद्योग विस्तारीकरणाचे पर्यावरण अनुमतीपत्र मे. लक्ष्मी ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्या नावे हस्तांतरित करण्याच्या प्रस्ताव पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरणाकडे विचाराधीन आहे. उद्योग प्रतिनिधीने दिलेल्या माहितीनुसार, सदर उद्योगाने डिसेंबर, २०२३ मध्ये व्यावसायिक उत्पादन सुरू केले असून जून-२०२५ मध्ये एका पीएफएएस संवर्गातील घटकाचे उत्पादन सुरू केले आहे.

पाण्यात पीएफएएसच्या प्रमाणासाठी कोणतीही विशिष्ट नियमावली नसल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ पीएफएएसची चाचणी आणि देखरेख करत नाही. तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर उद्योगाच्या सांडपाण्याची चाचणी केली असून सदर उद्योगाचे सांडपाणी मानकाच्या मर्यादेत असल्याचे दिसून येते.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सदर प्रकल्प बंद करण्याबाबतची निवेदने स्थानिक नागरीक व विविध संस्थांमार्फत प्राप्त झाली आहेत.

(४) पश्चिम घाट संवेदनशील क्षेत्राच्या अनुषंगाने माधव गाडगीळ समिती वा कस्तुरीरंगन समितीने शिफआरस केलेल्या बाबी/ संवेदनशील गावे इ. अद्यापि अंतिम नाहीत. तथापि, केंद्रीय पर्यावरण वने व वातावरणीय बदल मंत्रालयाने निर्गमित केलेल्या दि. २०.१२.२०१३ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापन (ऑफीस मेमोरॅन्डम) नुसार पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ मधील शेड्यूलनुसार "लाल संवर्ग"वर्गवारीतील नवीन उद्योग/ अस्तित्वातील उद्योगांचे विस्तारीकरण इ. बाबींना पर्यावरण अनुमती देण्यास बंदी घालण्यात आली असून सदर बाब दि.३१ जुलै, २०२४ रोजी निर्गमित प्रारुप अधिसूचनेन्वये कायम आहे. तसेच लाल संवर्ग सोडून अन्य उद्योगांसाठी जल (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९७४ व वायु (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योग स्थापना व उद्योग सूरू करण्यासाठीचे संमतीपत्र (Consent to Establish व Consent to Operate) घेणे आवश्यक असून संमतीपत्रातील अटी व शर्तींचे पालन करणे बंधकारक आहे. सदर संमतीपत्रामध्ये नमूद अटी व शर्तींचे उल्लंघन

केल्यास उद्योगांवर जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ व हवा प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ अतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारवाई करण्यात येते.

(५) सद्य स्थितीत PFAS संदर्भात अद्यापही धोरण निश्चित करण्यात आलेले नाही. सदर कंपनीच्या संमतीपत्रात दिलेल्या अटीनुसार, उदयोगाच्या उत्पादन प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या घातक घनकचरा व औदयोगिक सांडपाण्यावर सुरक्षित वैज्ञानिक पध्दतीने साठवणुक करून, शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येत असल्याचे, तसेच हवा प्रदूषण नियंत्रण करण्यासाठीची आवश्यक यंत्रणा स्थापित केली असल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नमूद केले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उतेखोल (ता.माणगाव, जि.रायगड) येथील डम्पिंग ग्राउंडमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याबाबत

**(२८) * २४६०८ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उतेखोल (ता.माणगाव, जि.रायगड) येथील आश्रमशाळेला लागूनच डम्पिंग ग्राउंड असल्याने तेथे साठणाऱ्या हजारो टन कचऱ्यामुळे आणि तेथे वारंवार लागणाऱ्या आगीमुळे परिसरात विषारी धूर पसरत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डम्पिंग ग्राउंडच्या विषारी धुरामुळे आश्रमशाळेतील ४०० विद्यार्थी आणि २५ कुटुंबांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊन त्यांना श्वसनाचे विकार, डोळे झोंबणे व मळमळणे अशा व्याधी जडल्या आहेत, तसेच पावसाळ्यात या कचऱ्याचे सांडपाणी थेट काळ नदीत मिसळून पाणी प्रदूषित होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कचऱ्याच्या शास्त्रोक्त विल्हेवाटीबाबत स्थानिक मुख्याध्यापक व नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून विद्यार्थ्यांचा जीव वाचविण्यासाठी सदर डम्पिंग ग्राउंड तातडीने स्थलांतरित करण्याबाबत व कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) उतेखोल, ता.माणगाव, जि.रायगड येथील आश्रमशाळेला लागून असलेल्या डम्पिंग ग्राउंडवर अनेक वर्षांपासून साठलेल्या कचऱ्याला अज्ञात इसमांकडून वारंवार आग लावण्याच्या घटना घडत होत्या. याबाबत तक्रारी प्राप्त होताच शीघ्र प्रतिसाद वाहनाद्वारे आगीवर नियंत्रण ठेवण्याची कारवाई माणगाव नगरपंचायतीने केली आहे.

(२) अशी कोणतीही तक्रार तालुका आरोग्य अधिकारी, ता.माणगाव, जि.रायगड यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) स्वच्छ सर्वेक्षण प्रोत्साहन अनुदान व स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत शासनाकडून प्राप्त निधीतून माणगाव नगरपंचायतीने डम्पिंग ग्राउंडवरील साठलेल्या कचऱ्यावर बायोमायनिंगची प्रक्रिया पूर्ण केली आहे. तसेच सदर डम्पिंग ग्राउंड सर्वे क्र.६७/४/अ या नवीन जागेमध्ये स्थलांतरित केले असून शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट व प्रक्रिया करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एआयच्या मदतीने उमेदवाराशिवाय आरटीओ एजंटच्या मदतीने शिकाऊ अनुज्ञप्ती (लर्निंग लायसन्स) मिळवण्याचे गैरप्रकार घडत असल्याबाबत

**(२९) * २३३७४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एआयच्या मदतीने उमेदवारा शिवाय शिकाऊ अनुज्ञप्ती (लर्निंग लायसन्स)ची काही सेकंदात चाचणी द्यायची आणि उत्तीर्ण होऊन लायसन्स आरटीओ एजंटच्या मदतीने मिळवण्याचे तसेच ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी, ई-चलन इत्यादी सेवांशी संबंधित बनावट वेबसाईट, फसवे मोबाईल ॲप्सव्दारे पाठविल्या जाणाऱ्या खोट्या लिंकव्दारे नागरीकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२२ ते २०२५ या कालावधीत सुमारे ३२ लाख वाहन शिकण्यासाठीचे शिकाऊ अनुज्ञप्ती जारी केले असून त्यापैकी किती उमेदवारांनी शिकाऊ अनुज्ञप्ती चुकीच्या पद्धतीचा वापर करून मिळविला असल्याने आता परिवहन विभाग शोध घेणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खोट्या लिंकव्दारे वाहन चालक/मालक यांची आर्थिक फसवणूक, वैयक्तिक माहितीची चोरी तसेच नागरिकांच्या ओळखीचा गैरवापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, जालना जिल्ह्यात सायबर गुन्हेगारांनी परिवहन विभागाच्या अधिकृत सरकारी प्रणालीत अनधिकृत प्रवेश मिळवून बनावट चालक परवाने वितरित केल्यामुळे रस्ते सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण होवून शासकीय नियमांचे उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार बिहारमधून पकडला असून त्याच्याकडून लॅपटॉप, आयफोन व थंब मशीन असा सुमारे १ लाख ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे आणि यामध्ये ‘एनआयसी’ मधील (NIC) काही कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच, मंगळवेढा (जि.सोलापूर) शहरात आरटीओच्या बनावट ई-चलन लिंकवर क्लिक केल्यामुळे एका नागरिकाची ८ लाख ४९ हजार ९९३ रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाली असून संबंधित प्रकरणात अज्ञात हॅकरने बनावट पीडीएफ (एपीके) फाईलचा वापर करून माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या (IT Act) विविध कलमांचे उल्लंघन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून बनावट परवाने घेणाऱ्यांवर व देणाऱ्यांवर कारवाई करण्यासह शिकाऊ अनुज्ञप्ती रद्द करण्याकरिता तसेच बनावट वेबसाईट, मोबाईल ॲप्सला आणि भविष्यात अशा प्रकारच्या फसवणुकीला आळा घालण्यासाठी सायबर सुरक्षा प्रणालीत आणि अधिकृत संकेतस्थळाच्या सुरक्षिततेत सुधारणा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) सन २०२२ ते २०२५ या कालावधीत एकूण २८.३२ लाख शिकाऊ अनुज्ञप्ती जारी करण्यात आलेल्या आहेत. चुकीच्या पध्दतीचा वापर करुन मिळवलेल्या शिकाऊ अनुज्ञप्तीचा तपास राष्ट्रीय सुचना केंद्र, पुणे व सायबर पोलीस ठाणे, जालना यांचेमार्फत सुरु आहे.

(३) परिवहन विभागाच्या बनावट लिंक तयार करुन वाहन चालक / मालक यांची आर्थिक फसवणूक केल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत. तथापि वाहन मालकाच्या माहितीची चोरी झाल्याबाबतच्या घटना निदर्शनास आलेल्या नाहीत.

(४) हे अंशत: खरे आहे.

(५) हे खरे आहे.

(६) हे खरे आहे.

मंगळवेढा (जि. सोलापूर) शहरात आरटीओच्या बनावट ई- चलन लिंक क्लिक केल्यामुळे एका नागरिकाची ८ लाख ४९ हजार ९९३ रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाली आहे. याबाबत मंगळवेढा पोलीस ठाण्यात FIR क्रमांक १०८७/२०२५ दिनांक २६/१२/२०२५ रोजी भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत ३१८(४), ३१९(२) आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० अंतर्गत ६६(C), ६६(ड) अन्वये गुन्हा दाखल असून पोलीस विभागातर्फे पुढील तपास सुरु आहे.

(७)
- राष्ट्रीय सुचना केंद्र दिल्ली यांना शिकाऊ अनुज्ञप्ती च्या प्रक्रियेच्या अनुषंगाने गंभीर सुरक्षा उल्लंघनामुळे आणि राष्ट्रीय सुरक्षिततेचा धोका लक्षात घेता सुरक्षा ऑडीट करण्याची विनंती दिनांक ०१/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आली आहे.
- राज्यातील वाहन चालक व नागरिक यांना बनावट परिवहन वेबसाईट, मोबाईल ॲप्स तसेच खोट्या ई-चलन लिंकपासून सतर्क रहाण्याकरिता सर्व वृत्तपत्रात प्रसिध्दी देण्याबाबत महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांना दिनांक ०९/१२/२०२५ रोजी विनंती करण्यात आली आहे.
- उमेदवाराशिवाय लर्निंग लायसन्स मिळण्याच्या गैरप्रकाराबाबत सहायक मोटार वाहन निरीक्षक, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, जालना यांनी पोलीस ठाणे, सायबर, जि. जालना येथे दिनांक २६/११/२०२५ रोजी दाखल केलेल्या तक्रारीस अनुसरुन सायबर गुन्हे शाखेत गुन्हा क्रमांक - २३ /२०२५, कलम ३१८(४), ३३६(२) (३), ३४० (२), भा. न्या. संहीता सहकलम ४३(A)(B)(H), ६६(C), ६६(D), ७२, ७२(A) मा.त.क. सहकलम ३,४,७ मो.वा.का. नियम ११ केंद्रीय मोटार वाहन नियम, सहकलम ३७, ३८ आधार अधिनियम २०१६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे व सायबर पोलीस स्टेशनकडून शिकाऊ अनुज्ञप्ती जारी झालेल्या IP Address ची तपासणी चालू आहे. पोलीस ठाणे सायबर, जि जालना येथे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीसांनी चार आरोपींना अटक केली असून इतर आरोपींचा शोध सुरु आहे.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील ऊसतोड मजुरांच्या मुलांच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करण्याबाबत**

**(३०) * २४१२९ श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगाव (जि.बीड) तालुक्यात ऊसतोडीसाठी छत्तीसगड येथून आलेल्या मजुरांच्या दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार झाल्याची घटना माहे डिसेंबर, २०२५ मध्ये घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलींचे वडील व नातेवाईक दिनांक २४ डिसेंबर, २०२५ रोजी शेतात कामासाठी गेले असताना, गावातील एक किराणा दुकानदार आणि त्याच्या मित्राने या मुलींना शेतात नेऊन त्यांच्यावर अत्याचार केल्याचे व कोणास सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या घटनेमुळे ऊसतोड मजुरांच्या मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला असून, स्थलांतरित मजुरांच्या वस्त्यांवर सुरक्षित वातावरणाचा अभाव असणे आणि असामाजिक तत्त्वांकडून कायद्याचे उल्लंघन होणे ही बाब चिंताजनक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने दोन्ही आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करून पीडित मुलींना 'मनोधैर्य' व इतर शासकीय योजनांद्वारे सामाजिक व आर्थिक आधार देण्याबाबत तसेच भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी ऊसतोड मजुरांच्या मुलांच्या सुरक्षेबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) माजलगाव (जि.बीड) तालुक्यात ऊसतोडीसाठी छत्तीसगड येथून आलेल्या मजुरांच्या दोन अल्पवयीन मुलींवर दि.२४ डिसेंबर, २०२५ रोजी अत्याचाराची घटना घडल्याबाबत माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४७२/२०२५, दि.२९.१२.२०२५ रोजी कलम ६४ (१), ६५ (१), ३५१ (२) भा.न्या.सं., सह कलम ४, ८, १२ पोक्सो कायदा, सह कलम ३(१)(w)(i), ३(१)(w)(ii), ३(२) ॲट्रॉसीटी कायदा अन्वये गुन्हा दाखल केला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) सदर गुन्ह्यातील दोन्ही आरोपींना दि.३०.१२.२०२५ रोजी अटक करण्यात येऊन दि.०२.०१.२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. सध्यस्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

सध्यस्थितीत दोन्ही पीडित मुली स्वाधारगृह बीड येथे असल्याने त्यांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी बँक पासबुक व पॅनकार्ड प्राप्त करून घेण्याबाबत अध्यक्ष, बाल कल्याण समिती, बीड यांना कळविण्यात आले आहे.

राज्यात महिला व मुलींवरील अत्याचार प्रतिबंध करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१) महिला व बालकांच्या अनैतिक मानवी वाहतुकीस प्रतिबंधक करण्याच्या उद्देशाने राज्यात एकूण ४५ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षांची स्थापना करण्यात आली आहे.
२) महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे.
३) महिला व मुली यावरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता पोलीसांची गस्त वाढविणे, पोलीस काका, पोलीस दीदी या उपाययोजना करण्यात येत आहेत.
४) सर्व पोलीस ठाणे स्तरावर महिला मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.
५) राज्यात २० पोक्सो व १२ जलदगती न्यायालय स्थापन करण्यात आले आहेत.
६) बलात्कार व ॲसिड हल्यातील पिडीत व्यक्तींना १० लाखापर्यंत मदत दिली जाते.
७) महिला हेल्पलाईन क्र.१०३, १०९१, ११२ कार्यरत असून त्याद्वारे महिलांना २४*७ मदत देण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोर्डवे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांवर होत असलेला अत्याचार

**(३१) * २६७९९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर),**

**श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोर्डवे (ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग) येथील आश्रम शाळेतील स्वयंपाकी, श्री.रुपेश यादव हे विद्यार्थ्यांना वेळेत जेवण न देता त्यांना नाहक मारहाण करीत असून विद्यार्थीनीसोबत अश्लील चाळे करीत असल्यामुळे तेथे शिकत असलेल्या विद्यार्थीनीने कणकवली पोलीस ठाण्यात त्याच्यांविरुध्द दिनांक १९ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कणकवली पोलिसांनी त्याला आजतागायत अटक केली नसून आश्रमशाळेचे मुख्याध्यापक आश्रमशाळेचे अध्यक्ष तसेच इतर मागासवर्ग कल्याण विभागाचे सहायक आयुक्त पाठीशी घालत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर आरोपीस अटक न करता सहायक आयुक्त कार्यालय, ओरोस (जि.सिंधुदूर्ग) येथे कामावर रुजू करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, कणकवली येथे गु.र.क्र.३३१/२०२५, दि.११.१२.२०२५ रोजी कलम ७५, ७९ भा.न्या.सं., सह कलम १२ पोक्सो अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी आरोपीस कलम ३५(३) भा.ना.सु.सं. अन्वये नोटीस देण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी संस्थेद्वारे चौकशी समिती स्थापन करुन आरोपीस दि.०२.०१.२०२६ रोजी पासून निलंबित करण्यात आले असून त्यास हजर करून घेण्यात आलेले नाही.

(४) व (५) सदर प्रकरणी आरोपीविरुद्ध मा.न्यायाधीश विशेष तथा जिल्हा सत्र न्यायालय, सिंधुदुर्ग यांचे न्यायालयात दि.०४.०२.२०२६ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

-----------------

## राज्यातील विशेषत: चंद्रपूर येथील अल्पभूधारक शेतकऱ्याने खासगी सावकाराच्या जाचाला कंटाळून किडनी विकल्याबाबत

**(३२) * २२९७९ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राजेश बकाने (देवळी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण),**

**श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सावकारांच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी शेतकऱ्यांना स्वत:ची किडनी विकाली लागत असून, सदर किडनी विक्रीचे रॅकेट तामिळनाडू येथील तिरुचिरापल्ली (तिरुची) येथील एका हॉस्पिटलद्वारे चालविले जात आहे व या प्रकरणात आंतरराज्य व आंतरराष्ट्रीय मानवी अवयव तस्करीचे जाळे कार्यरत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, मिंथूर (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) येथील श्री.रोशन सदाशिव कुडे या दुधाचा व्यापार करणाऱ्या अल्पभूधारक शेतकऱ्याने खासगी सावकारांनी अवघ्या १ लाख रुपयांच्या कर्जाचे व्याज वाढून ते ७४ लाखांपर्यंत पोहोचल्याने आणि सावकाराच्या जाचाला कंटाळून कम्बोडियामध्ये जाऊन किडनी विकावी लागल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदर प्रकरणी सोलापूर येथील एका व्यक्तीने आतापर्यंत १६ जणांना किडनी तसेच इतर मानवी अवयव विकण्यासाठी कोलकाता मार्गे कंबोडिया येथील पनॉम पेन प्रेआ केट मेआलिया या लष्करी रुग्णालयामध्ये विकली असून, सदर व्यक्तीने देखील स्वत:ची किडनी रुपये ८ लाखात विकल्याचे कबूल केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, अहिल्यानगर जिल्ह्यात परवानाधारक खासगी सावकारांनी सन २०१५ या वर्षात सुमारे १९ कोटी ८१ लाख ६५ हजार रुपयांचे कर्जवाटप ४६१९ जणांना केलेले असून, खाजगी सावकारामुळे व त्यांच्या जाचाला कंटाळून शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून व काहींनी किडनी विकल्याची प्रकरणे दाखल आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विदर्भातील चंद्रपूरसह इतर जिल्ह्यांमध्येही खाजगी सावकारांच्या जाचामुळे शेतकऱ्यानी किडनी विक्री केल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील ग्रामीण भागातील अवैध सावकारी मोडून काढण्यासाठी आणि गरीब शेतकऱ्यांना या रॅकेटपासून वाचवण्यासाठी विशेष तपास पथकामार्फत (SIT) राज्यव्यापी मोहीम राबविण्यासह संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) फिर्यादी यांनी गुन्ह्यातील सहा आरोपीतांकडून एकूण ९.१५ लाख इतके सावकारी कर्ज घेतले होते. त्या कर्जाच्या व्याजासह त्यांनी आरोपींना ४८.५३ लाख ची रक्कम व १ एकर जमीन परतफेड म्हणून दिली. तरीही आरोपींचा पैशांसाठी सततचा पाठपूरावा सुरूच राहिल्याने त्यास कंटाळून फिर्यादीने मध्यस्थाच्या माध्यमातून कंबोडिया येथे जाऊन Preah Ket Mealea Hospital, Phnom Penh, Cambodia या हॉस्पिटलमध्ये स्वत:ची किडनी रुपये ८ लाख मध्ये दि. १४.१०.२०२४ रोजी विकली व सदरची रक्कम ६ आरोपीतास देऊन त्यांचे कर्ज फेडले.

तदनंतर, सदर प्रकरणी दि. १६.१२.२०२५ रोजी फिर्यादी यांनी दिलेल्या तोंडी रिपोर्टच्या आधारे पो.स्टे. ब्रम्हपूरी येथे अप.क्र. ६५४/२०२५ भा.दं.वी. कलम ३२६, ३८७, ३४२, २९४, ५०६, १२०(ब) व महाराष्ट्र सावकारी अधिनीयम २०१४ मधील कलम ३९, ४४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तसेच, सदर प्रकरणी सावकारीच्या पैशांची परतफेड करण्यासाठी फिर्यादी यांनी स्वत:च्या शरीरामधील किडनी विकल्याचे निदर्शनास आल्याने सदर गुन्ह्यात दि.२१.१२.२०२५ रोजी भा.न्या.सं. २०२३ चे कलम १४३(१)(a)(f), १४३(२) व मानवी अवयव व उती प्रत्यारोपन अधिनीयम १९९४ चे कलम १८,१९ समाविष्ट करण्यात आले आहे.

तसेच, सदर गुन्ह्याचे तपासा दरम्यान फिर्यादीसह इतर राज्यातील अन्य ४ पीडित व्यक्तींना देखील आरोपीतांनी किडनी विक्री करण्यास प्रवृत्त केल्याचे दिसून आल्याने सदर प्रकरणात भा.न्या.सं.२०२३ च्या कलम १४३(३) अन्वये दुसऱ्यांदा कलमवाढ करण्यात आली आहे.

तपासादरम्यान असे निदर्शनास आले की फिर्यादी यांनी सोलापूर स्थित एका इसमाच्या माध्यमातून कंबोडीया येथे स्वत:ची किडनी विकली आहे. त्यादरम्यान असेही निदर्शनास आले की या मध्यस्थाने स्वतःसह अन्य ९ व्यक्तींच्या किडनी कंबोडिया व स्टारकिम्स हॉस्पिटल्स, त्रिची, तामिळनाडू येथे विक्री केलेल्या आहेत.

त्यामुळे सदर प्रकरणी सावकारी करणाऱ्या ६ आरोपीतां बरोबरच किडनी खरेदी विक्रीत सहभागी असणाऱ्या अन्य ५ इसमांना आरोपी करण्यात आले आहे. त्यापैकी सावकारी प्रकरणातील ६ आरोपी तसेच इतर २ आरोपी यांना अटक करण्यात आली आहे व त्यापैकी ६ आरोपी न्यायालयीन कोठडी मध्ये आहेत व इतर २ आरोपींना जामीन मिळालेला आहे. अटक न झालेल्या ३ आरोपींपैकी २ आरोपींना इंट्रीम/ ट्रांन्झीट बेल मिळालेली आहे. १ आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे. अशा पद्धतीने सदर प्रकरण समोर येताच पोलिसांनी व्यापक व सखोल तपास करून मानवी अवयवांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी कार्यवाही केली आहे व आणखी सखोल तपास करण्यात येत आहे.

(३) सोलापूर येथील एका इसमास दिनांक २२.१२.२०२५ रोजी अटक करण्यात आली. त्याने सुध्दा कंम्बोडीया येथे स्वत:ची किडनी ८ लाख रुपयात विकलेली आहे. तसेच, त्याच्या मध्यस्थीने फिर्यादीसह एकूण ९ जणांनी आपली किडनी विकल्याचे तपासादरम्यान निदर्शनास आले. यापैकी ७ जण अन्य राज्यातील आहेत.

(४) हे अंशत: खरे आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात माहे नोव्हेंबर २०२५ अखेर परवानाधारक सावकारांनी १९ कोटी ८१ लाख ६५ हजार रुपयांचे कर्जवाटप ४६१९ व्यक्तींना केले आहे. खाजगी सावकारामुळे व त्यांच्या जाचाला कंटाळून शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून व काहींनी किडनी विकल्याची बाब अहिल्यानगर जिल्हयात निदर्शनास आलेली नाही.

(५) चंद्रपूर जिल्ह्यात खाजगी सावकाराच्या जाचामुळे किडनी विक्रीबाबतची एक तक्रार प्राप्त आहे. त्यानुषंगाने, उपरोक्त उपप्रश्न (१) च्या उत्तरात नमूद केल्यानुसार दि.१६.१२.२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अन्य जिल्ह्यात अशा तक्रारी प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(६) श्री. रोशन कुळे यांनी दि.१२.०१.२०२६ च्या अर्जान्वये जिल्हा उपनिबंधक, चंद्रपूर यांच्याकडे सावकारीच्या ओघात संपादन केलेली त्यांच्या कुटूंबाची मालमत्ता परत करण्याबाबत अर्ज दाखल केला आहे. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांनी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या कलम १८(२) अन्वये सदर प्रकरणावर अर्जदार व गैरअर्जदार यांना नोटीस बजावली असून सुनावणीची कार्यवाही सुरू आहे. तसेच अनधिकृत सावकारी व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्याच्या उद्देशाने तसेच सावकारी व्यवसायावर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय यांनी दि.०१.०३.२०१७ व दि.१७.०७.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीस

आवश्यकतेनुसार अवैध सावकारी रोखण्यासाठी भरारी पथके निर्माण करणे तसेच अवैध सावकाराविरुध्द कार्यवाहीत सुसुत्रता आणण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

तसेच, बेकायदेशीर व अवैध सावकारी चे प्रस्थ मोडीत काढण्यासाठी घटक प्रमुखांना वेळोवेळी सुचना देण्यात आल्या आहेत.

तसेच, चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्याने सावकारी कर्ज फेडण्यासाठी किडनी विकल्याच्या घटनेची निष्पक्ष, सखोल व व्यापक चौकशी करण्यासाठी पोलीस महासंचालक यांच्या स्तरावरुन दिनांक ३०.१२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार सदर प्रकरणाचा विशेष तपास पथकामार्फत सखोल व व्यापक तपास सूरु आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसेसमध्ये अवैध तिकीट विक्री होत असल्याबाबत

**(३३) * २४८०६ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसेसमध्ये माहे एप्रिल, २०२४ ते मार्च, २०२५ या कालावधीत अवैध तिकीट विक्रीची २४,१२१ हून अधिक प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे १३ लाख बसेसच्या तपासणीदरम्यान भाडे वसूल करून तिकीट न देणे, भाडे न घेता तिकीट देणे तसेच जुन्या तिकिटांची पुनर्विक्री करणे असेही प्रकार घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यांसह प्रमुख १० विभागीय मुख्यालयांतर्गत अशा अवैध तिकीट विक्री अधिक प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन बसेस मध्ये माहे एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधित संपूर्ण महाराष्ट्र भर सुरक्षा व दक्षता खात्याने एकूण १,०७,१३० इतक्या बसेसची तपासणी केलेली असून, तपासणीत वाहकांची अपहार प्रकरणे ३,००२ इतकी उघडकीस आणलेली आहेत. सदर तपासणी दरम्यान केलेल्या कार्यवाहीत, प्रवासभाडे रु.५,९९,४८५/- व दंड रू.४४,७८७/- असे एकुण रु.६,४४,२७२/- इतकी वसुली करण्यात आलेली आहे.

(३) याबाबतची तक्रार प्राप्त नाही.

(४) व (५) सुरक्षा व दक्षता खात्याने केलेल्या तपासणी दरम्यान दोषी आढळून आलेल्या वाहकांवर रा. प. महामंडळाच्या शिस्त व आवेदन कार्यपद्धती नुसार कारवाई करण्यात आलेली आहे.

-----------------

## बीड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांतर्गत वाहन तपासणी प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(३४)** * **२४१३० श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांतर्गत वाहनांची प्रत्यक्ष तपासणी न करता परराज्यातून बनावट योग्यता प्रमाणपत्रे (Fitness Certificates) मिळवून देण्याच्या प्रकरणात गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यातील ३०० पेक्षा जास्त वाहनांना छत्तीसगड, मध्य प्रदेश आणि गुजरात येथील मध्यस्थांमार्फत (एजंट) प्रत्यक्ष तपासणीविना प्रमाणपत्रे देण्यात आली असून यामध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय फी ७.५ हजार रुपये असताना मध्यस्थामार्फत (एजंट) १० ते २० हजार रुपये घेऊन केवळ फोटोंच्या आधारे 'वाहन ४.०' प्रणालीवर ऑनलाइन अपडेट करून नियमांचे उल्लंघन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या बेकायदेशीर कृत्यामुळे अपात्र वाहने रस्त्यावर धावत असल्याने सार्वजनिक सुरक्षिततेला धोका निर्माण झाला असून यामुळे शासनाच्या महसुलाचेही मोठे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित ५ मध्यस्थावर (एजंटांसह) व इतर संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह भविष्यात अशी फसवणूक टाळण्यासाठी शासन 'वाहन' प्रणालीत काही तांत्रिक सुधारणा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) परिवहन वाहनाचे योग्यता नुतनीकरण तपासणीसाठी स्वयंचलित तपासणी केंद्राचे शासकीय शुल्क खालीलप्रमाणे निश्चित आहे :-

१. मोटार सायकल-रु. ५००/-
२. तीन चाकी/लहान हलके वाहन- रु. १०००/-
३. मध्यम वाहने- रु. १३००/-
४. जड वाहने- रु. १५००/-

(४) वाहन योग्यता प्रमाणपत्र जारी करण्याकरिता शुल्क हे वाहनाचे वय व योग्यता प्रमाणपत्राची वैधता संपल्याच्या कालावधीनुसार आकारणी होत असते व शुल्क भरल्याशिवाय कोणत्याही वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र प्रदान केले जात नाही.

(५) मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम ५६ व केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ चे नियम ६२ चे उल्लंघन करून कायद्याने विहित केलेल्या कार्यपद्धतीचा वापर न करता प्रत्यक्ष संबंधीत ATS स्थित ठिकाणी वाहन तपासणी न करता वाहनांना योग्यता प्रमाणपत्र जारी करीत असल्याचे निदर्शनास आल्याने APPU NOVEL SERVICE, इंदोर, मध्य प्रदेश येथील स्वंयचलित वाहन तपासणी केंद्र (ATS), खासगी व्यक्ति आणि एनआयसी च्या वाहन ४.० या संकेतस्थळावरील वाहनांच्या माहितीचा शासकीय ॲक्सेस असणाऱ्या एनआयसी मधील अज्ञात व्यक्तीविरोधात पोलीस ठाणे, बीड ग्रामीण येथे गु.र.नं. ००११/२०२६ नुसार दिनांक ०९/०१/२०२६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.